# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००९ |
| वर्ष | : | दहावे |
| अंक | : | १० |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १४५**

MAHMAR/ 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.
दिशा

वर्ष दहावे / अंक १० / सप्टेंबर २००९

## संपादकीय

## स्मरण भाभांचे

राष्ट्र म्हणजे नकाशामधील केवळ भौगोलिक प्रदेश नाही; तर राष्ट्र म्हणजे त्या भौगोलिक प्रदेशामध्ये वास्तव्य असणाऱ्या जिवंत नागरिकांचा समाज होय! हा जिवंतपणा कल्पक, चिंतनशील व विवेकी अशा नेतृत्वाचा, त्या नेतृत्वाच्या संचयाचा परिपाक असतो. प्राचीन भारताचा विचार करता ऋषिमुनी, चिंतनशील कवी, संशोधक यांनी हा जिवंतपणा टिकवला हे जाणवते. तत्त्वज्ञान, आयुर्वेद, योग, विशुद्ध व उपयोजित कला यांची निर्मिती ही त्यांच्याच सृजनशीलतेचा अविष्कार आहे. या ज्ञानसंचयावर आपण हजारो वर्षे जगत आहोत. भारतालाच नव्हे तर सर्व जगाला या ज्ञानाने प्रेरणा दिल्या आहेत.

बाराव्या शतकानंतर मात्र हे स्वरूप पालटले. मुसलमानी आक्रमणे, त्यांची जुलमी राजवट व त्यानंतरच्या काळात इंग्रजांचा वसाहतवाद यांच्याबरोबर झगडण्यामध्ये येथील नेतृत्वाची शक्ती खर्ची पडू लागली. या काळातही अनेक नररत्ने जन्माला आली. पण तुलनेने ती कमीच आहेत. अलीकडच्या काळात म्हणजे २० व्या शतकात आपण स्वतंत्र झालो.

पाश्चात्त्य देशांत प्रबोधनयुग १५ व्या शतकात सुरू झाले होते. बायबल आणि टॉलेमीचे वर्चस्व कमी होऊन विज्ञान आणि तर्काचे युग सुरू झाले. त्यातून औद्योगिक व वैज्ञानिक क्रांतीने जन्म घेतला. आजवर या युगाचा विकास चालू आहे. भारताचे यातील योगदान कमीच आहे, हे कटु असले तरी सत्य आहे. मात्र २० व्या शतकापासून भारतातही अनेक शास्त्रज्ञांची परंपरा निर्माण झाली. या परंपरेतील ज्यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे होत आहे असे महत्त्वाचे वैज्ञानिक म्हणजे डॉ. होमी जहांगीर भाभा हे होत.

होमी भाभा यांचा जन्म ३० ऑक्टो. १९०९ रोजी मुंबईला झाला. ते केवळ मर्मग्राही, निष्णात संशोधकच नव्हते; तर त्यांचे व्यक्तिमत्त्व अष्टपैलू होते. त्यांचे शिक्षण मुंबई व केंब्रिज येथे झाले. विद्यावाचस्पती (पीएच.डी) या पदवीसाठीचे संशोधन कार्य त्यांनी केंब्रिजच्या किंगज् महाविद्यालयातून पूर्ण केले. वैश्विक किरणांचे स्वरूप व त्यांची वैशिष्ट्ये या पदार्थ विज्ञानातील नवीन क्षेत्रात मूलभूत संशोधन करून त्यांनी भारताच्या विज्ञान क्षेत्रात नवीन युगाला प्रारंभ केला.

(पृष्ठ क्रमांक ४० वर)

# देव्यापराधक्षमापन स्तोत्र

श्री शंकराचार्य विरचित ‘देव्यपराधक्षमापन स्तोत्र’ व त्याचा मराठी पद्यानुवाद नवरात्राच्या निमित्ताने देत आहोत. काव्यगुण हा या स्तोत्राचा विशेष आहेच, शिवाय आर्तता देखील लक्षात घेण्यासारखी आहे. पार्वती, दुर्गा या देवीरूपांची जगन्मातेच्या रूपातील थोरवी हा या काव्याचा भागही विलोभनीय आहे. मूळ संस्कृत शिखरिणी वृत्तातील स्तोत्राचा मुक्त पद्यानुवाद येथे देत आहोत. आपण केलेल्या अपराधांबद्दल क्षमा मागणारे हे स्तोत्र आहे.



*श्री गणेशाय नम:*

*न मन्त्रं नो यन्त्रं तदपि च न जाने स्तुतिमहो*
*न चाह्वानं ध्यानं तदपि चन न जाने स्तुतिकथा: ।*
*न जाने मुद्रास्ते तदपि च न जाने विलपनम्*
*परं जाने मातस्त्वदनुसरणं क्लेशरहण् ।।१ ।।*

*विधेरज्ञानेन द्रविणविहरेणालसतया*
*विधेयाशक्यत्वात्तव चरणयोर्या च्युतिरभूत् ।*
*तदेतत्क्षन्तव्यं जननि, सकलोद्धारिणि शिवे*
*कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति ।।२ ।।*

*पृथिव्यां पुत्रास्ते जननि बहव:सन्ति सरला:*
*परं तेषां मध्ये विरलतरोऽहं तव सुत: ।*
*मदीयोऽयं त्याग: समुचितमिदं नो तव शिवे*
*कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति ।।३ ।।*

*जगन्मातर्मातस्तव चरणसेवा न रचिता*
*न वादत्तं देवि द्रविणमपि भूयस्तव मया ।*
*तथापि त्वं स्नेहं मयि निरुपमं यत्प्रकुरुषे*
*कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति ।।४ ।।*

*परित्यक्ता देवा विविधविधिसेवाकुलतया*
*मया पञ्चाशीतेरधिकमपनीते तु वयसि ।*
*इदानी चेन्मातस्तव यदि कृपा नापि भविता*
*निरालम्बो लम्बोदरजननि कं यामि शरणम् ।।५ ।।*

*श्वपाको जल्पाको भवति मधुपाकोपमगिरा*
*निराकङ्को रङ्को विरहति चिरं कोटिकनकै: ।*
*तवापर्णे कर्णे विशति मनुवर्षे फलमिदम्*
*जन: को जानीते जननि जपनीयं जपविधौ ।।६ ।।*

*चिताभस्मालेपो गरलमशनं दिक्पटधरो*
*जटाधारी कण्ठे भुजगपतिहारी पशुपति: ।*
*कपाली भुतेशो भजति जगदीशैकपदवीम्*
*भवानि त्वत्पाणिग्रहणपरिपाटीफलमिदम् ।।७ ।।*

*न मोक्षस्याकाङ्क्षा [१] भवविभववाञ्छाऽपि च न मे*
*न विज्ञानापेक्षा शशिमुखि सुखेच्छाऽपि न पुन: ।*
*अतस्त्वां संयाचे जननि जननं यातु मम वै*
*मृडानी रुद्राणी शिव शिव भवानीति जपत: ।।८ ।।*

*नाराधितासि विधिना विविधोपचारै:*
*किं रूक्षचिन्तपरैर्न कृतं वचोभि: ।*
*श्यामे त्वमेव यदि किञ्चन मय्यनाथे*
*धत्से कृपामुचितमम्ब परं तवैव ।।९ ।।*

*आपत्सु मग्न: स्मरणं त्वदीयं*
*करोमि दुर्गे करुणार्णवे शिवे ।*
*नैतच्छठत्वं मम भावयेथा:*
*क्षुधातृषार्ता जननीं स्मरन्ति ।।१० ।।*

*जगदम्ब विचित्रमत्र किं*
*परिपूर्णा करुणाऽस्ति चेन्मयि*
*अपराधपरम्परावृत्तं*
*न हि माता समुपेक्षते सुतम् ।।११ ।।*

*मत्समॅ पातकी नास्ति पापघ्नी त्वत्समा न हि ।*
*एवं ज्ञात्वा महादेवि, यथा योग्यं तथा कुरु ।।१२ ।।*

*इति श्रीमच्छङ्कराचार्यविरचितं देव्यपराधक्षमापन स्तोत्रं सम्पर्णम् ।*

*श्रीदुर्गार्पणमस्तु ।*

व्ही. पी. एम्.

# दिशा

## वर्ष दहावे / अंक १० / सप्टेंबर २००९



**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १५ वे / अंक ३ रा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com


## *अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| १) | चिंतनाचे कवडसे | प्रा. डॉ. प्रदीप कर्णिक | ३ |
| २) | संत जनाबाई | श्री. शं. बा. मठ | ८ |
| ३) | ''करो जतन यापुढे प्रभूपिता अनाथा सदा'' | श्रीमती आशा भिडे | १२ |
| ४) | दान | श्री. यशवंत माने | १४ |
| ५) | भारतीय संस्कृती – बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | १७ |
| ६) | धगधगते यज्ञकुंड : वि. दा. सावरकर | श्री. सुरेंद्र लागू | २६ |
| ७) | संध्या – समालोचन (साहित्य जगत) | श्री. शरद जोशी | २९ |
| ८) | ऑक्सफर्डच्या विज्ञान–इतिहास संग्रहालयाला भेट | डॉ. सुधाकर आगरकर | ३३ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | ३६ |



या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ७५ वर्षांहून अधिक काळ शिक्षण क्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, व्यवस्थापन शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व प्रगत अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची सोय संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून विविध उपक्रम संस्था राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा व स्पर्धांत उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रांत कार्यप्रवण आहेत.

दूरदर्शन, सिनेमे व सवंग नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. संस्कारक्षम विद्यार्थ्यांना, वाचकांना, नागरिकांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने 'दिशा' हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

या मासिकाचे वर्गणीदार होऊन, या मासिकात जाहिरात देऊन किंवा लेख पाठवून आपण आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती ! तसेच, आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

संपादक, दिशा
**विद्या प्रसारक मंडळ,**
**नौपाडा, ठाणे – ४०० ६०२**
दूरध्वनी : २५४२ ६२७०

टीप : वर्गणी /जाहिरात वा देणगीची रक्कम धनादेशाने पाठवावी. धनादेश (चेक) ''विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा'' या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/-**

अंकाची किरकोळ
विक्रीची किंमत रु. २५/- फक्त.

वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, टपाल सूची क्रमांक (पिनकोड नंबर) व दूरध्वनी क्रमांक कळवावा.


# चिंतनाचे कवडसे

*आपल्या मनात अगणित विचारांचे कल्लोळ असतात. त्यांतून काही विचारांना शब्दांतून बांधणं अवघडच. त्यात मन संवेदनशील असावं लागते. पुढील चार स्फुटांतून अशा चिंतनशील, आत्मगर्भ विचारांचे कवडसे आले आहेत. विचारांना दिशा देणारे हे कवडसे--- विचारांचे - संपादक*

## सुचणं :

शब्द ओठांशी येतात आणि थबकतात. का? का ते मात्र उमगत नाही. कळत नाही. वाटतं बोलावं आता, पण शब्दांना फुटत नाही वाट, मनाच्या विहीरीवरचा फिरत नाही रहाट, येत नाही बाहेर फसफसून जसं असेल तसं पाणी आणि आत आत तळाशी गाडून टाकलेली गाणी ...

पण कळी मात्र म्हणतो की,
''वाटले मज गुणगुणावे
ओठ पण झाले तिऱ्हाईत ...
सुचत गेली रोज गीते
मी मला सुचलोच नाही ...''



रोजी गीतं सुचतात ही केवढी भाग्याची गोष्ट! निर्मितीची एक सुखद सुरेख संवेदना. प्रसवाची गोड अमूल्य वेदना. आणि नवजन्माची उत्कट भावना. गीतं निर्माण होऊन गेली आहेत. ती गुणगुणावी असंही वाटतंय आणि शब्द बोलणारे ओठ मात्र गच्च मिटलेले, दुमडलेले, बंद झालेले, ढिम्म तिऱ्हाईतासारखे.

तिऱ्हाईत कोण? ज्याला माहीत नाही रीत आणि मनात निर्माण होणारं गीत, तोच असतो ना तिऱ्हाईत? नाही तर त्याने म्हटली नसती का ती गाणी? निर्माण झाली होती ज्यात मनाचीच वाणी? दुसऱ्या तिसऱ्याला कळत नसतं आपलं मत. मग कशाला तो गुणगुणेल आपलं होऊन तन मन धन?

हा न बोलणारा, न पुटपुटणारा कुणी दुसरा तिसरा असतो तेव्हा ते असते कदाचित ठीक, पण माझे ओठ मलाच होतात परके, तेव्हा रोजच्या सुचण्याला तरी उरतो का अर्थ? निर्मिती तर होते आहे आणि ती जगाला सांगणारे माध्यम तिऱ्हाईतासारखे. दुसऱ्याला काय पडली आहे हो, माझी अति नाजुक, भावना जपायची आणि मांडायची पण माझ्याच ओठांना मात्र त्या भावना कळत नाहीत. सांगायच्या नाहीत. गुणगुणायच्या नाहीत.

किती क्रूर परिस्थिती आहे ही. मानाला गुणगुणावे असं वाटतंय. ते बाहेर येऊ पहातंय आणि ओठ त्याच्याशी सहकार्य करायला तयार नाहीत. ओळखीचा, अगदी जवळचा माणूस भेटावा आणि त्याने ओळखच देऊ नये, तशी अगदी ही अवस्था. मनात आलं ते ओठावर येतंच! ती माणसं स्वच्छ, निरागस, मोकळी, ढाकळी, पण मनातं कितीही थैमान घातलं तरी ओठ, चेहरा, डोळे सारं सारं निर्विकार ठेवणारी माणसं सुद्धा काही कमी नसतात. त्यांचे ओठ आणि त्यांचे शब्दही त्यांनाच तिऱ्हाईतासारखे होत असतात. राहतात कायम मरणाच्या अंतापर्यंत. ते जगत राहतात. ही तटस्थ अवस्था म्हणायची का?

कवीला आपले ओठ असे तटस्थ झालेत असं वाटतंय का? तटस्थ नाहीत हे ओठ. कोणतेही शब्द येवोत-जावोत त्यात मुरणे नाही, गुंतणे नाही, अडकणे नाही म्हणजे तटस्थपणा. तशी ही अवस्था नाही. देहाला, त्या देहाच्या मनाला, गुणगुणावे अस वाटतंय, पण ओठ जणू दुसऱ्याचेच लावल्यासारखे. त्या देहापासून तुटलेले किंवा त्या देहाला

उपरे येऊन चिकटलेले किंवा चिकटवलेले, कृत्रिम जोडलेला अवयव जिवंत कसा असेल?

गीतांची निर्मिती ही सृजनशक्ती तर लाभली आहे पण त्याचा आविष्कार करणारे ओठ जिवंत नाहीत, मृतच जणू. किती भयप्रद अवस्था, नाही? रोज सुचणारी गीतं मनात निर्माण होत आहेत पण कवी म्हणतो 'मी मला सुचलोच नाही.'

माझे मलाच सुचणे ही काय मेख आहे? शब्दांची, रंगांची, चित्रांची, कल्पनांची, शिल्पांची निर्मिती 'सुचणे' उमलत जाणे समजू शकते. हे मीचे स्वत: विषयीचे सुचणे आहे ते काय! ते मनातले शब्द की शब्दातल्या भावना? आत्मशोधाचा संवाद की वादविवादांचा शोध? आत्मानुभूतीचा आवाज की आवाजाचा प्रकार? नेमके काय?

आणि महत्त्वाचे म्हणजे माझा मीच मला सुचलो तरी उपयोग काय, कारण पुन्हा ती गीतं गाऊ शकणारे ओठ मात्र पुन्हा तिऱ्हाईतच नाहीत का?

---

**इंधन :**

खूप दाटून येतं. वाटतं, नाही आता लगाम ठेवता येणार शब्दांवर, ओठांवर, मनावर, वाणीवर. बोलूनच टाकावं. धडाधड बोलतच सुटावं. बोलतच राहावं. सांगून मोकळं व्हावं एकदाचं. कोंडलेले शब्द आणि कोंडलेला विचार एकाच ताकदीचे. वाफेवर इंजिन चालतं. विचारांवर देहाचं इंजिन चालतं. दोघांनाही लागतं इंधन. एकाला कोळशाचं तर दुसऱ्याला कोळून काढलेल्या अनुभवांचं. अनुभव कसाही असो, दगडी कोळशासारखा ज्वालाग्राही किंवा फुलांच्या पाकळ्यांसारखे मुलायम काही. इंधन पडत असतं मन पेटत असतं, पेटूनही उठतं कधी कधी.

कवी म्हणतो,

''असेच पेट पेटूनी
पुन्हा पुन्हा विझायचे
हव्या हव्या सणासही
नको नको म्हणायचे.''

अनुभवाचं इंधन पडतंय. सारखं. एकसारखं. आणि त्यामुळे मन पेट घेतंय. पेटून उठतंय, पण पुन्हा पुन्हा विझतही जातंय. हे विझवणारं कोण? विझवण्याचं कारण काय? विझवणारेही आपणच आणि पेटवणारेही आपणच!

पेटून उठायचं. संकल्प करायचा. निश्चय करायचा. निर्णयही घ्यायचा. पाऊल मात्र उचलायचं नाही. पाऊल उचलायच्या क्षणीच आतून कोसळायचं. स्वत:च विझवून टाकायचं. नको. नकोच ते. नाहीच जमणार आपल्याला, असं मनातल्या मनात म्हणायचं आणि विझून घ्यायचं आपलं आपल्याला. मनातल्या संकल्पनांना विकल्पात ढकलून द्यायचं. काही वेळात पुन्हा नवं इंधन. नवी ज्वाला. नवा निखारा. नवा पेट. पुन्हा जळा. संकल्प. पुन्हा नवा विकल्प.

काय म्हणतात याला? हॅम्लेट म्हणाला होता To be or not to be. जगावं की मरावं. मर्ढेकर म्हणाले होते, 'जगायची पण सक्ती आहे, मरायची पण सक्ती आहे.' मराठीत याला सुंदर शब्द आहे. 'दोलयमान.'

अशी दोलायमान अवस्था येते तेव्हा संध्याकाळच कातर होते असं नाही, तर सकाळही बेईमान होते. कोवळ्या किरणांसह. वेळ कोणती का असेना, मन एखाद्या फुलाप्रमाणे, गवताच्या पात्याप्रमाणे हेलकावे खात राहातं. कधी इथे कधी तिथे. पेटल्या मनाचा असेल वहात जसा वारा, तसा हालत राहतो मनाचा ध्रुव तारा. मनातल्या विचारांना मिळत नाही अढळपद आणि 'अढळ मन ध्रुवाचा ढळतो तारा' त्याला काहीच का करता येत नाही? कोणीच का रोखू शकत नाही?

---

चांगली माणसं वाऱ्याच्या झुळकीसारखी असतात. दिसली नाहीत तरी त्यांचे सुखद अस्तित्व जाणवत राहतं.

मन विझतं, पण 'हवेपण' विझतं का? मनातला अंगार थंड होतो, पण हव्यास लोपतो का? हवं असतं ते हवंच असतं. जागा बदला, माणसं बदला, पण हवं असण्याचा विचार का कधी बदलता येतो का?

मन आतून आक्रंदन करतंय. 'हवंय, हवंय' म्हणून टोकतंय. पण मान, ओठ, डोळे, चेहरा, हात म्हणत असतात, 'नको नको' असं का? ताकाला जाऊन भांडं लपवायलाच का शिकतो आम्ही! हवं असताना नको का म्हणतो आपण? लाज वाटते? ओशाळतो? वय आड येतं. सभ्यता, संस्कृतीचा पडदा हालत राहतो? की हवं असणंच विचित्र असतं?

वयाला, नावाला, सभ्यतेला न शोभणारं असेल तर ते एक वेळ ठीकच आहे, पण 'फूल' हवंय असं मन म्हणतंय आणि नको नको असे शब्द ओठावर येतात त्याला काय म्हणायचं? भीड? मन पेटून ऊठतं. मग विझतं. मग पुन्हा दोलायमान होतं. आणि भीडेत सारं तिथेच राहतं.

असं तिथेच, म्हणजे मनाच्या तळाशी साठून राहिलेलं किती असेल काहीबाही? काय करायचं त्यांच! काय होत असेल त्यांच? गंजत असेल की फुगत असेल? कळत नाही. पण कधी तरी त्रास देतं आणि त्याचंच पुन्हा इंधन होतं.

---

**तहान :**

तहान पाण्याचीच असते का? तहान म्हणजे कोणत्याही गोष्टीची 'आस'. मग ती शब्दांची असो, स्पर्शाची असो, आनंदाची असो अथवा पाण्याची असो. एकदा का कधी तहान लागली की ती पूर्ण करेपर्यंत, तृप्त होईपर्यंत अन्य काहीच नकोसे होते. ही तृप्ती करण्यासाठीच सारी वणवण, धडपड आयुष्याची. प्रत्येक क्षणी तरी तहान, नवी आस. सारे आयुष्य म्हणजेच एक दीर्घच दीर्घ तहान. त्याच्या मागे धावणे. मग अनेकदा मृगजळच का असेना समोर; धावाधाव ही जन्माचीच. पुरलेली. पुरून उरलेली.

पण कवी मात्र म्हणतो,

''आणि कालची तहान मेली
ओठावरती दुसरीच आज
व्यर्थ नव्हे का ओंजळ जेथे
शरीर म्हणते सारे पाज.''

तहान मरते कशी? आपोआप मरते? की मारली जाते? की जुनी तहान भागण्यापूर्वीच दुसरीच तहान लागते मनाला? ती ओढ इतकी अनावर होते की मागच्या तहानेची पर्वासुद्धा वाटत नाही, अशी होते का स्थिती? दुसरी तहान लागणे, दुसऱ्याच गोष्टीची ओढ, आसक्ती वाटणे हा तर चंचल मनाचा स्थायीभावच, तहान न भागल्यामुळे भागण्याची कोणतीच परिस्थिती नसणं, आणि त्यामुळे मन दुसरीकडे वळणं ही निराळी बाब म्हणायला हवी. पण ती मरते कशी व का? कोण मारतं तिला?

मृत्यू नैसर्गिक येतो तो नकळत, पण जबरदस्तीनं आणला जातो, त्याला काय म्हणायचे? 'मेली/मेला एकदाचा' असं का काहीतरी. मुद्दामहून मारून टाकलेली तहान अभिप्रेत असावी असं इथं दिसतंय.

इच्छा, आकांक्षा, स्वप्ने आपण मारतही असतो आणि त्यांना नैसर्गिक मरणही येत असतं. काही काळ त्यांच्या मरणाचं दु:ख वाटतंही. पण शोक अनावर होत नाही. त्याची तृप्ती झाली तर आनंदच आनंद. नाही झाली तरी ठीक आहे, अशी वृत्तीच पुढच्या दुसऱ्या आकांक्षेवर मनाला घेऊन जाते.

पाण्याच्या तहानेचं मात्र तसं नसतं. एकदा का पाण्याची तहान लागली की समोर अमृत का येईना, पाण्याची सर कशालाच नाही. मग ते पाणी कुठलंही असू दे. गरम, गार, कडी कपारीतलं किंवा अगदी आड गावातल्या

---

गलिच्छ वस्तीतलं. पाण्याच्या जागी पाणीच हवं. दूध नको, खीर नको. नको मिरांडा अथवा कूल ठंडा.

अशी ही पाण्याची तहान मरते कशी? विसरता येते कशी? समुद्रावरच्या प्रवाशांना याचा अनुभव नेहमी येतो. जवळचा पाणी पुरवठाच संपतो. मग प्रवास सुरू होतो पाण्याच्या शोधाचा. गिर्यारोहक, वनविहारी यांनाही याचा अनुभव येतो. त्यांची तहान लांबवली जाते, पण मरते का? मारली जाते का? प्रवासाची दिशा बाकी सर्व सोडून पाण्याच्या साठ्यापाशी येऊन मग पुन्हा मूळ प्रवासाला वळते अशाच नेहमीचा अनुभव.

पेला, लोटा, ग्लास, भांडं, फूलपात्र, मग, काही तरी साधन लागतंच पाणी प्यायला. पण नसलं तरी अडत नाही. पसा पसा पाणी पिता येतं ओंजळीनं. हात पसरायला तिथे अजिबात वाटत नाही लाज, अशी एकमेव जागा म्हणजे पाणवठा. तिथे मुकाही बोलू शकतो ओंजळीनं, अगदी 'जागते रहो' च्या अपार करुण मुद्रेनं.

ओंजळ ओंजळ भरून पाणी पोटात रिचवल्यावर होते जेव्हा तृप्ती तेव्हा वाटसरू लागतो आपल्या वाटेला, पण ही तहान कालची आहे. आणि आजच्या ओठांवर, वेगळीच दुसरीच तहान लागली आहे. मग कालची तहान गेली कुठे? कालपासून आजपर्यंत भटकतोय. कालची तहान मेली, ती तृप्त होऊन की न होऊन? तृप्त होऊनच मरू शकते एखादी आस. भागते. चव कळते, मगच त्याच्या पुढची, मोठी, विस्तारित आस सुरू होते ना?

ही विस्तार पावलेली तहान ओंजळीने भागणार नाही याची खात्री वाटते. कालच्या छोट्या तहानेची आठवण मरावी अशी इच्छा आहे. ती इतकी आवडली आहे की ओंजळ त्याला पुरणार नाही. प्रत्येक नस न् नस ओंजळ झाली आहे. थेंब अन् थेंब रक्ताचा पसा पसा होऊन मागणी करतोय. आक्रंदतोय. ही तहान पाण्याची नक्कीच नाही.

शेवटी कोणती आस न संपणारीच असते. तिथे सारेच व्यर्थ नसते का?

---

**चंद्रांमृताचं तळं :**

गोंगाट बाहेरही असतो आणि आतही असतो. बाहेर चालणाऱ्या गोंगाटाला ध्वनिप्रदूषणाचे कायदे लावता येतात. पाश्चिमात्य जगात अशी शांतता प्रस्थापित करण्यात ती माणसं कमालीची यशस्वी झाली आहेत. यदाकदाचित आपणही होऊ यशस्वी. शांतता किती निरतिशय सुंदर असते, ते जे ती अनुभवतात, त्यांनाच समजू शकते, पण आज तरी आमच्या अवतीभवती नुसता कोलाहल आहे, गोंगाट, गडबड, बडबड, वचवच, नुसती भरून राहिली आहे. ध्वनिक्षेपक, घंटा, भसाड्या आवाजातलं बोलणं, नाचणं, बजावणं. काय नाही असं नाहीच. सारं काही आहे. फक्त नाही आहे शांतता. शांतता कुठं शोधायची? कशी मिळवायची? मिळालीच तर कशी टिकवायची? टिकली तर तिचं अखंडत्व कसं राखायचं? म्हणूनच कवी म्हणतात,

''अशा एखाद्या तळ्याकाठी बसून राहावे मला वाटते
जिथे शांतताच स्वत: निवारा शोधीत आली असते.''

असं एखादं आडरान असावं. त्यामध्ये एक शांत, स्तब्ध, निराकार पाण्यानं भरलेलं तळं असावं. पाण्यावर दाट सावली पडावी अशी घनदाट झाडी काठाकाठाने असावी. काळ्या कभिन्न दगडाचा चौरंग अवती-भवती असावा, जणू काही मातीतून तो दगड, तो कातळ नुकताच उगवलाय, जन्माला आलाय. अशा दगडावर बसून त्या निराकार पाण्याकडे पहात राहावं. ते पाणी डोळ्यात साठवायचं की, ती शांतता अतृप्तीने पीत राहायचं की, त्या कातळावर हलकं होऊन सैल होत होत जायचं? नेमकं काय करायचं?

नको वाटते पानांची सळसळ, की एखाद्या चुकार

---

जो माणूस दुसऱ्याबद्दल विकृत बोलतो, तो कायम अशांतच राहतो.

पक्षाचं उत्सुक बोलणं. काही नको असतं, या अशा शांत... दीर्घ शांत... कोमल, नाजूक, अलवार शांतच शांत वातावरणात. बसलोय जणू काल, आज, उद्या, परवा, तेरवा आणि त्याही पुढे अनंत काळ, जितके काळ टिकेल ही शांतता, तळ्यातली. तळ्यावरची. तळ्या भोवतीची. तळ्याच्या काठावरची. तळ्यातल्या निराकाराची.

असेल का असं एखादं ठिकाण. असेल का असं एखादं तळं की ज्याची पाळं-मुळं पीत असतात केवळ शांती आणि केवळ शांतीच. कुठे असेल? कसं असेल? केव्हा भेटेल? भेटेल तेव्हा अगदी असंच का भासेल? की वेगळंच जाणवेल?

कवी तर म्हणतोय की हे तळं तर असं आहे की, जिथे शांतता स्वत: निवारा शोधायला आली आहे. शांततेचीही शांती ढळते का? शांततेला शांततेचीच गरज भासते का? भासत असेल तर ती एक केवढी मोठ्ठी थट्टाच झाली नाही का? सूर्याला प्रकाशाची गरज लागावी, सुगंधाला वासाची आठवण यावी, असंच नाही का? पुन्हा या शांततेला निवारा हवाय. बेवारस झाली आहे का ती?

ती थकली का आहे? दमून तर गेली नाही ना आवाजाने? गलबलाटाने? जीव घुसमटला गेला तर नाही ना या शांततेचा, या जीवघेण्या जगात? थकून गेलेली शांतता बाहेरची की आतली?

बाहेरच्या आवाजाने थकायला होते की आतल्या? आतला गोंगाट घेऊन, अगदी हिमालयात जरी गेलो आणि तिथल्या सरोवराच्या काठी बसलो तरी सापडेल का शांती? आतला गोंगाट, कुठेही जा, बरोबर येणारच! तो जोपर्यंत टाकत नाही तोपर्यंत कुठल्याही तळ्याकाठी गेलो तरी शांतता नाही. शांती नाही.

गोंगाट टाकायचा कसा? निर्विचार व्हायचं कसं? स्तब्ध, शांत मन करायचं कसं! कोणत्या तळ्याकाठी? पृथ्वीवरच्या की स्वर्गातल्या? कुठं असेल ते तळं?

माउली म्हणतात ते, 'चंद्रांमृताचं तळं' तर नसावं ते? ते असेल तर, असेल तिथं नक्कीच निराकार, स्तब्ध शांती. तिथेच लाभत असेल का मन:शांती?

प्रत्येकाच्या मन:शांतीतली शांती, नक्कीच शोधत असते निवारा, एखाद्या तळ्याकाठी, पण ते तळं शोधायला हवं असतं शांत मन. शांत मनानेच सापडते वाट तळ्याकडे जाण्याची. ही वाटच वेगळी असते. शांतता प्या. मग नक्की सापडेल ते तळं. चंद्रांमृताचं तळं!



(आकाशवाणीच्या अस्मिता वाहिनीवरील 'ऐसी अक्षरे' या कार्यक्रमातून प्रसारित झालेले हे चिंतन. आकाशवाणीच्या सौजन्याने. सं.)

**प्रा. डॉ. प्रदीप कर्णिक**
फ्लॉवर व्हॅली, नारळी पाडा,
हायवे, ठाणे

●●●

# संत जनाबाई

*श्रेष्ठ संत कवयित्री जनाबाई. स्वत:ला नामयाची दासी मानणाऱ्या जनाबाईंचा हा परिचय – संपादक*

**जनाबाईचा जन्म :**

गोदावरीच्या तीरी गंगाखेड गावी दमा नावाचे सद्गृहस्थ राहात होते. त्यांची धर्मपत्नी करुड ही अत्यंत सात्विक देवभक्त होती. हे दांपत्य पांडुरंगाची भक्ती करी. त्याच्या दर्शनासाठी उभयता वारंवार पंढरीला जात. एकदा दमा पांडुरंगाच्या भजनात रमून गेला. भजन करता करता ध्यानी, मनी व जनी, पांडुरंग दिसू लागला. त्याच रात्री दमाच्या स्वप्नात पांडुरंग आले व त्याला म्हणाले – दमा तू वंशवेल टिकवण्यासाठी माझ्याकडे मुलगा मागितलास, पण तुला लवकरच एक सद्गुणी मुलगी होईल. ही कन्या तुझ्या कुळाचा उद्धार करील आणि तोच त्याला जाग आली. ही आनंदाची बातमी त्याने आपल्या पत्नीला जागे करून सांगितली. आपल्या घरात पाळणा हलणार या विचाराने दोघेही आनंदित झाली. विठ्ठलाच्या कृपेने कालांतराने त्यांना मुलगी झाली. तिचे नाव जनाई असे ठेवण्यात आले.

**पंढरीच्या देवळात :**

जनाई आता मोठी झाली. आई वडिलांबरोबर पांडुरंगाच्या दर्शनासाठी पंढरीस गेली. त्यावेळी देवळात टाळ मृदंगाच्या वाद्यात भक्त जनांचा विठ्ठल नामाचा गजर चालू होता. तसेच त्यांच्या मधून वाट काढीत दमा व करुड आपल्या लाडक्या लेकी सह देवाच्या पायाशी आले. दमाने जनाईला विठ्ठलाच्या चरणावर ठेविले. पांडुरंगाचे रूप न्याहाळत जनाईने पांडुरंगाला वंदन केले व एकटक त्याच्याकडे पाहातच राहिली. पाहता पाहता तिचे भान हारपले. तिला वाटले इथून आपण जाऊच नये. लेगच ती आई वडिलांना म्हणाली – आपण या देवळातच राहू या. वडील म्हणाले – बाळ आपले गाव दुसरे. इथे विठ्ठलाकडे राहून आपले कसे चालेल? मात्र जनाई काही केल्या ऐकेना. तिने विठ्ठलाच्या पायाला घट्ट मिठी मारली. आणि निश्चयपूर्वक वडिलांना म्हणाली – मी घरी येणार नाही. तुम्ही आपल्या घरी जा. तिच्या हट्टा पुढे त्या उभयतांचे काही चालेना. अत्यंत नाइलाजाने जनाईला तिथेच ठेवून विरह व्याकुळतेने ती उभयता घरी परतली. त्याच रात्री दमाला दृष्टान्त झाला. जनाईचे पालकत्व मी स्वीकारले आहे असे विठ्ठलाने सांगितले.

**दामाशेटी यांच्या भेटीमुळे :**

जनाई पंढरीत पांडुरंगाच्या नाम जपात मग्न होऊन राहिली. थोड्या वेळाने संत नामदेवाचे वडील दामाशेटी नेहमीप्रमाणे पांडुरंगाच्या दर्शनास आले. त्यावेळी मंदिराच्या द्वाराजवळ बसलेल्या सात वर्षाच्या बालिकेकडे त्यांचे लक्ष गेले. त्याने तिची चौकशी केली व बरीच माहिती मिळविली. देव दर्शनानंतर त्याने तिला आपल्याबरोबर घरी नेले. नामदेव पांडुरंगाच्या देवळात निघाला होता. वडिलाबरोबर छोट्या मुलीला पाहून थबकला. वडिलांनी त्या मुलीची ओळख करून दिली आणि ही आपल्या घरीच राहणार असेही सांगितले. नामदेवाने त्या मुलीकडे पाहिले व भक्तिमय जिव्हाळा तिला पाहताच निर्माण झाला. नामदेवाचे कुटुंब तसे मोठे होते. इतक्यात नामदेवाची बहिण निंबाई हिने जनाईच्या हाताला धरून तिला घरात नेले. नामदेवाच्या घरात आलेली जनाई त्याच्याच घरची झाली. दामाशेटीने आपल्या घरा लगत जनाईला एक खोपटी बांधून दिली. जनाई तिथे विश्रांती घेत असे. जनाईने नामदेवाचे घर

आपलेसे केले. ती घरातली पडेल ती कामे करी. केर, धुणी, भांडी व काय करावे लागेल ते सारे काम आनंदाने करी. सकाळी उठून रात्री झोपेपर्यंत ती घरकाम करी. तिला त्या घरात खरे सात्विक प्रेम मिळाले. जनी नामयाची दासी झाली. आपल्या अभंगातून तिने तसा उल्लेख पण केला आहे.

**नामदेवाचा अधिकार :**

एके दिवशी जनाई नामदेवाबरोबर देवळात गेली. नामदेवाच्या हातात नैवेद्याची वाटी होती. नामदेव जनाईला म्हणाला – आज तुला मी एक आश्चर्यकारक गोष्ट दाखविणार आहे. नामदेवाने देवाची पूजा केली. नैवेद्याची वाटी पांडुरंगासमोर ठेवली. डोळे मिटून पांडुरंगास आळवू लागले. इतक्यात आश्चर्य घडले. पांडुरंग आपले जागे वरून हालला आणि नैवेद्याची वाटी रिकामी करून गेला. हे पाहून जनाईने नामदेवाच्या पायावर डोके टेकले. त्याचा अधिकार जनाईच्या लक्षात आला. नामदेवाच्या हातचे प्रसाद ग्रहण करणारा पांडुरंग बघून जनी अचंबित झाली. तिला आता पांडुरंगाचा वेध लागला. ती वारंवार देवळात जाऊन एकटक पांडुरंगाकडे पाहू लागली. जनाई घरातली कामे पांडुरंगाच्या स्मरणात करू लागली. ती पांडुरंगाचा आठव करी. तिला विठ्ठलाचा जराही विरह सहन होत नसे. नामदेव तिला म्हणाले होते – तू नित्य पांडुरंगाचे आठव कर. त्याचे नाम स्मरण जप कर. नामदेवांनी सांगितलेला मंत्र जनीने अपूर्वाईने जपला. जनी आता अभंग लिहू लागली.

**जनाईचे काही अभंग :**

आता जीव जाऊ पाहे। धाव घाली माझे माये।
माझी भेटता जननी। सन्ता विनवी दासी जनी।

जनीची ही आर्तता पांडुरंगानी ऐकली. स्वत: देव तिच्या प्रत्येक कामात सहभागी होऊ लागले. जनीचे अभंग देखील देव स्वत: लिहून ठेवू लागले. पंढरी हेच जनीचे माहेरघर झाले. जनी तिच्या समकालीन संतांच्या अभंगात आणि पांडुरंगाच्या नामजपात रंगून जात असे. तिला फक्त नामदेव दिसे व त्याच्या समोर नाचणारा तो पांडुरंग. आणखी काहीच नाही.

**भक्तीत रंगली जनी :**

पांडुरंग नाम जप। हे चि माझे महा तप।
सर्व सुख पायी लोळे। जनी संगे विठ्ठल बोले।
जनी अंगे ब्रह्म झाली। ही माझ्या नामयाची कृपा।

नामदेवामुळे जनी ज्ञानदेवादी भावंडांच्या सहवासात आली. ज्ञानोबांचे मानवतेने भरलेले विश्व व्यापक विशाल मन बघून त्यांना उद्देशून जनी म्हणते –

ज्ञानाचा सागर। सखा माझा परमेश्वर।
मरोनिया जावे। वा तुझ्या पोटी यावे।
ऐसे करी माझ्या भावा। सख्या माझ्या ज्ञानेश्वरा।
जावे ओवाळूनी। जन्मोजन्मी म्हणे जनी।

ज्ञानदेवा प्रमाणे मुक्ताई जनीच्या जीवनात सखीप्रमाणे आली. दोघींनी परस्पराना मिठी मारली एकमेकांचे सुखदु:ख सांगितले. त्या दोघी बहिणीच्या नात्याने रमून गेल्या. भगवंताच्या नाम चिंतनात मग्न झाल्या. जनी म्हणू लागली–

येग येग विठाबाई। माझे पंढरीचे आई।
भीमा आणि चंद्रभागा। तुझे चरणीच्या गंगा।

जनीचे माहेर पंढरपूर, जनीचे जीवन पांडुरंग, विठ्ठलाने जनीला स्फूर्ती दिली. ज्ञानदेव, नामदेव यांनी तिला अध्यात्माचे धडे दिले. पंढरीतील विश्वव्यापक पांडुरंग विश्व विद्यालयात ती भक्ति संपन्न झाली.

**काही अनुभव :**

एके दिवशी मध्यरात्री सारी पंढरी निद्रित असताना एकाएकी ढग जमा झाले. विजा कडाडू लागल्या. मुसळधार पाऊस पडू लागला. त्यातच सोसाट्याचा वारा वाहू लागला. नामदेवाच्या घरावरील व त्याच्या लगतच्या खोपटीवरील

छपर उडून गेले. मात्र घरात पावसाचा थेंब नाही. घरातील मंडळी पांडुरंगाच्या नामजपात मग्न होऊन शांत होती. थोड्याच वेळाने स्वत: पांडुरंग तेथे आला त्याने नामदेव व जनाईच्या घरावरील छपर घालून दिले. नंतर नामदेव व पांडुरंग यांचा बराच वेळ संवाद चालला. तो जनाईने ऐकला. तिने पांडुरंगाच्या चरणावर मस्तक ठेविले व तिचे देहभान हरपले.

जनाबाईला असा अनुभव सतत येत असे. ती दळण कांडण वा इतर घरकाम करत असताना पांडुरंग तिला मदत करी. हे सारे तिने आपल्या अभंगात वर्णिले आहे. ती देवाची लाडकी भक्त, लेक, बहिण, सखी असल्याचे तिच्या अभंगावरून कळते. खरोखर जनाबाईच्या प्रत्येक कर्मात पांडुरंग ओतप्रोत भरलेला आढळतो. जीवनातील परमोच्च आनंदाचा क्षण संत जनाबाईच्या जीवनात उगवला. पांडुरंगाकडे जनाईने ज्ञानोत्तर अलौकिक भक्तिसुख लुटण्यासाठी वारंवार जन्म मागितला. आणि जनाबाई संजीवनी समाधित स्थिर झाली.

**धन्य संत जनाबाई :**

संत रत्नांत संत जनाबाई ही मुख्य प्रतिनिधी आहे. संत नामदेवाच्या घरी आली त्यावेळी ती एक पोरकी जनी होती. मात्र संत नामदेवासारखा महान भक्त विठ्ठलाच्या कृपेने तिला प्राप्त झाला आणि तिच्या जीवनाचे सोने झाले. वारकरी सांप्रदायातील ती एक थोर स्त्री झाली. विठ्ठल भक्तीचा आदर्श नमुना म्हणजे संत जनाबाई.

मुक्ताई, जनाई, ज्ञानदेव, नामदेव या संत रत्नांच्या प्रभावामुळे वारकरी सांप्रदाय व भागवत धर्म समृद्ध झाला. विठ्ठलभक्ती जनाईत रोम रोमात भिनली होती. अध्यात्माचे रहस्य तिला संत नामदेवाकडून लाभले. याबद्दल ती म्हणते–

नामयाचे ठेवणे जनीस लाभले । धन सापडले विटेवरी ।
धन्य माझा जन्म धन्य माझा वंश ।
धन्य विष्णुदास नामा स्वामी माझा ।

ती विठ्ठलाला आई, ज्ञानोबाला सखा, व स्वत:ला नामदेवाची दासी मानते. तिचे अभंग अध्यात्म विचारांनी परिप्लुत आहेत. दळिता कांडता । तुज गाईन अनंता । असे म्हणणारी जनाई धन्य होय. विठ्ठल भक्तीचा महापूर तिच्या जीवनातून ओसंडून वहात होता.

**विठ्ठलमय जनी :**

हाताने काम मुखाने विठ्ठलाचे नाम, तिचे प्रत्येक कर्म विठ्ठलमय झाले. एकदा शेणाच्या गोवऱ्यावरून शेजारणीशी खटका उडाला. दोघींच्या गोवऱ्या शेजारी शेजारी सुकण्यासाठी घातल्या. एकमेकीच्या गोवऱ्या ओळखणे कठीण. पंच निवाड्यासाठी आले. जनाई म्हणाली – ज्या गोवरीतून विठ्ठल नाम ऐकू येईू ती माझी. पंचांनी प्रत्येक गोवरी कानाला लावून विठ्ठल नाम ऐकू येणारी गोवरी बाजूला केली व त्या सर्व गोवऱ्या जनाईला दिल्या उरलेल्या गोवऱ्या दुसऱ्या बाईला दिल्या. असे होते जनाईचे विठ्ठलमय कर्म. अशा प्रकारे ही नामयाची दासी उच्चस्थानी पोहोचली.

जनाईच्या मनातच परमेश्वराच्या भक्तीची आस निर्माण झाली. प्रापंचिक जीवन दरिद्री असताना अंतर्जीवन भक्तीने समृद्ध बनविता येते. याचे बोलके उदाहरण म्हणजे जनी होय. स्त्री जन्माच्या बद्दलची उदासीनता लुप्त झाली आनंदाची पहाट उगवली. लोहाला परीसाचा स्पर्श होताच त्याचे सोने होते त्याप्रमाणे जनाईचे जीवन नामदेवामुळे सोनियाचे झाले.

**भक्तीने भारलेले जीवन :**

प्रेमाने देवाला आपलेसे करावे, त्याच्या भजनात कीर्तनात रंगून जावे असे जनी म्हणते –

येऊनिया जन्मा एक। करा देहाचे सार्थक ।
वाचे नाम विठ्ठलाचे । तेणे सार्थक जन्माचे ।
ऐसा नामाचा महिमा । शेष वर्णिता झाली सीमा ।
नाम शास्त्री त्रिभुवनी । म्हणे नामयाची जनी ।

संतापाचे परिणाम कारणापेक्षाही अधिक क्लेशकारक असतात.

क्षेत्र पंढरीस भक्त जनाना भेटावे. हृदयात भक्तिभाव धरावा. देवाला अनन्यभावे शरण जावे. देव भक्ताचे जन्म मरणाचे फेरे चुकवितो. भक्ताना अखंड सुखाचा ठेवा देतो. कीर्तनाचा रस सेवन केला असता अमरत्व प्राप्त हाते. चारी मुक्ती पायाशी लोळण घेतात. ईश्वरभक्ती एवढ्यासाठीच करावी. अशी जनीची धारणा होती. संत नामदेवाकडून तिला नाम मंत्र लाभला. त्या नामस्मरणाचा अगाध महिमा तिने मुक्त कंठाने गाईला.

'मज भरवसा नामाचा। गजर नाम्याच्या दासीचा।

परमात्म भक्तीसाठी संत जनांचा सहवास आवश्यक असे जनाई म्हणते. डोळ्यांनी देव पहावा, कानानी त्याचे महात्म्य स्मरण करावे, वाचेने त्याचेच गुणगान करावे, हातांनी त्याची पूजा करावी, पायांनी त्याचीच वाटचाल करावी. असा सर्वांगाने देव भेटीचा अनुभव घ्यावा. संत म्हणजे देवच. संतांच्या चरणी जनाईला देव भेटीचा अनुभव येतो. ती म्हणते –

जनी म्हणे ऐसे साधु। तया पाशी तू गोविंदु।

संत संगतीत जीवदशा पालटे.

**भवसागरातून तरून जा :**

शरीर नश्वर आहे. ईश्वरप्राप्ती या देहाकडून करून घ्यावी लागते. षड्रिपूच्या आधीन न होता मन कणखर करावे. परमेश्वराच्या भक्तीत आसक्ती उरत नाही. वासना शून्य मनाने देवाचे ध्यान करावे. संसार दु:खद आहे. जन्म मरण, अनेक प्रकारचे कष्ट सहन करावे लागतात. संसारातून मुक्त होण्यासाठी विठोबाचे नाम घ्यावे असे जनाई सांगते. संसार सागरातून तारून नेणास तो एक विठ्ठल आहे ही श्रद्धा बाळगा. जगी विठ्ठल रुक्मिणी। तुम्ही अखंड धरा ध्यानी। विठ्ठल स्मरणाने जनीचे जीवन सार्थकी लागले.

दळू कांडू खेळू। सर्व पाप तप जाळू।<br>
सर्व जीवामधे पाहू। एक आम्ही होऊनि राहू।<br>
जनी म्हणे ब्रह्म होऊ। ऐसे सर्वाधरी पाहू।<br>
हा पारमार्थिक अनुभव जनी सांगते।<br>
देव देते देव घेते। देवा सवे व्यवहारिते।<br>
जनी म्हणे विठाबाई। भरूनि उरले अंतरबाही।

जनी विठ्ठलाकडे आली व विठ्ठलरूप झाली. आजही जनीचे अभंग सर्वांच्या मनाची पकड घेतात.

'गंगा गेली सिंधु पाशी। त्याने अव्हेरिले तीसी।<br>
तरी ते सांगावे कवणाला। ऐसे बोले बा विठ्ठला।<br>
जळ कोपे जळचरा। माता अव्हेरी लेकुरा।<br>
जनी म्हणे शरण आले। अव्हेरिता ब्रीद गेले।<br>
ज्याचा सखा। त्यावरी विश्वकृपा करी।<br>
उणे पडो ने दी त्याचे। वारेसोयी आघाताचे।<br>
जयावीण क्षणभरी। कटा आपण नव्हे दूरी।<br>
आंगा आपले वोदोनी। त्याला राखे जी निर्वाणी।<br>
ऐसा अंकित भक्तासी। म्हणे नामयाची दासी।<br>
ऐसा पुत्र देई संता। तरी त्या आवडी पंढरीनाथा।<br>
गीता नित्य नेमे। वायी ज्ञानेश्वरी प्रेमे। संतांच्या चरणा।<br>
करी मस्तक ढेंगणा। कन्या व्हावी भागीरथी।<br>
तुझे प्रेम तिचे चित्ती। ऐसे करी संतजना।<br>
वासी जनीच्या निघाना। हेचि देवाचे भजन।<br>
सदा राहे समाधान। येर आवघे सांसारिक।<br>
इंद्र वेद ब्रह्मादिक। वर कडावा पाड किती।<br>
जनी देवास बोलती। वैकुंठीचा हरी।<br>
तान्हा यशोदेच्या घरी। रांगजसे हा अंगणी।<br>
भाया जावळाची वेणी। पायी पैंजण आणि वाळे।<br>
हाती नवगीताचे गोळे। धन्य यशोदा माय।<br>
दासी जनी वंदी पाय।

**श्री. शं. बा. मठ**<br>
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,<br>
वंदना बस स्थानका जवळ,<br>
ठाणे – ४०० ६०२. दूरध्वनी : २५३५२०३०

●●●

# ''करी जतन यापुढे प्रभुपिता अनाथा सदा''

*''जगी ज्यास कोणी नाही ---'' अशी एखादी व्यक्ती पाहिली की मनाची घालमेल होते. ही घालमेल व्यक्त करणारा हा लेख - संपादक*

'वास्तू करी तथास्तु' श्री. मंदार घैसास यांच्या व्याख्यानमालेच्या पहिल्याच दिवशी व्याख्यानाला बरीच गर्दी होती. मी तशी थोडी मागेच बसले होते. वक्ता जीव ओतून बोलत होता. श्रोते जीवाचा कान करून ऐकत होते. सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय होता. माणूस जन्मल्यापासून त्याच्यावर ग्रह नक्षत्रे यांचाच नव्हे तर या पृथ्वीचा, पृथ्वीवरील सर्व वातावरणाचा, घराच्या भिंतींचा, छपराचा, घरातील माणसे, प्राणी, झाडे, वनस्पती सर्वासर्वांचा अनुकूल तसाच प्रतिकूल परिणाम होत असतो. आणि त्याचे बरे वाईट परिणाम प्रत्येकाला भोगावे लागत असतात. त्यासाठी आपण स्वतःच, आजुबाजूच्या परिसरात काही बदल करू शकतो का? करू शकत असलो तर ते कोणते, कसे, केव्हा कोणाकडून, कधी करून घ्यावेत. त्यासाठी काय करावे! ग्रह ताऱ्यात तर बदल घडवून आणणे शक्य नाही मग त्यांना अनुकूल करण्यासाठी काय उपाय करावेत या फार गहन गूढ विषयावर चार दिवस ही व्याख्यान माला चालणार होती.

पहिल्याच रांगेत एक मुलगी नाही म्हणता येणार, पण पस्तीशी उलटलेली बाई बसली होती. वहीत ती काहीतरी लिहून घेत होती. सारखी माना डोलवीत होती नि मान वेळावून मधून मधून मागे पाहून हसत होती. माझ्या बसल्या जागेवरून ती मला चांगलीच दिसत होती. नि तिच्या ह्या हालचालींमुळे सर्वांहून वेगळी उठून दिसत होती. दोन तास भाषण चालू होते. रात्रीचे दहा वाजायला आले होते. भाषण संपले तेव्हा. मग प्रश्नोत्तरे चालू झाली. चार दोन पुरुषांनी प्रश्न विचारून झाल्यावर या समोर बसलेल्या बाईने हात वर केला प्रश्न विचारण्यासाठी ती उठून उभी राहिली तिने एकच नाही तर चार पाच प्रश्न विचारले. ''तुम्ही म्हणता ग्रह ताऱ्यांचा या अवकाशातील ग्रहांच्या परिभ्रमणाचा आपल्यावर परिणाम होतो. पौर्णिमा-अमावस्या यांचा तर विशेषकरून. मग माझा जन्म कोजागिरी पौर्णिमेचा आहे. आणि माझ्या जीवनात अनेक संकटे आलीत त्याचे कारण पौर्णिमेचा जन्म हेच आहे की आणखी कुठले? त्याच्या निवारणार्थ काय करायला पाहिजे! आणखी कशामुळे ही संकटे आली असतील, का!, घर फिरले की घराचे वासेही फिरतात ही म्हण माझ्या बाबतीत खरी ठरलीय. आपण काय सांगू शकाल याबद्दल!'' अनेक प्रश्नांची सरबत्ती करून ती थांबली. दर प्रश्नानंतर ती मागे वळून हसून बघत होती. लोकांची प्रतिक्रिया काय आहे हे आजमावण्यासाठी की काय कोणास ठाऊक! पण ती सारखी हसून मागे वळून पहात होती. हे माझ्याच नाही तर सर्वांच्याच लक्षात येत होते.

वक्ते तिच्या एवढ्या प्रश्नांचा भाडीमार पाहून म्हणाले मी सुरुवातीलाच म्हणालो होतो माणसे, प्राणी, पशू-पक्षी, झाडे-वेली, कृमी कीटक यामधे जसे चैतन्य आहे तसेच पृथ्वीत म्हणजे या मातीच्या कणाकणात डोंगर, नद्या, नाले, घर घराच्या भिंती या सर्वांत चैतन्य आहे. या भिंती, खिडक्या, दरवाजे, छप्पर, खेळ खुर्ची, या निर्जीव नाहीत नाहीत तर त्यांच्यातही काही प्रमाणात ऊर्जा आहे. अणुबाँबची ताकद आता आपण जाणलीय. आणि या सर्वाचा परिणाम मानवी जीवनावर नक्कीच होतो. आपला उद्याचा विषय हाच आहे. आज प्रास्तविक, विषयाची ओळख झाली आता वेळ संपलीच तुमच्या प्रश्नांची उत्तरं उद्या तुम्हाला सविस्तर देता येतील. नंतर ओंकार प्रार्थना होऊन मंडळी उठली. अगोदरच उशीर झाला होता. सभागृहातच मागे वक्त्याच्या सी डीज् , पुस्तके विक्रीसाठी ठेवलेली होती. तिथेच वक्त्याचे कार्ड व माहिती पत्रक

मागे वळून पाहिलं तर मन आणखीनच उदास होतं.

सगळ्यांना दिले जात होते. मी व माझी मैत्रिण तिथेच उभं होतो. काही मंडळी वक्त्याजवळ कोंडाळं करून उभी होती. ती प्रश्न विचारणारी समोरची बाई आता आमच्याच तिथे आली.

'तुम्हांला कुठे जायचंय?' तिनं आम्हाला विचारलं. 'इथे जवळच राहतो आम्ही' 'हो का, मी डोंबिवलीहून आलेय.' 'अरे बाप रे, डोंबिवलीहून ठाण्याला! आता जाल कशा? कोणी आहे का बरोबर? उशीर झालाय.' 'नाही मी एकटीच आलेय. येताना रिक्षाने आले स्टेशनवरून आता बसने जाईन. इथे बसचा स्टॉप कुठेय जवळ?' 'रिक्षानेच जा ना उशीर झालाय खूप.' 'नाही, परवडणार नाही मला. बसनेच जाईन. मला सवय आहे. मी एकटीच राहते. माझे आई-वडील नाहीत. बहीण भाऊ विचारत नाहीत.' ''लग्न झालंय ना तुमचं! मुलं बाळं . . . '' ''घटस्फोट झालाय. नवऱ्याची केस चालू आहे कोर्टात. मुलं झालीच नाहीत.'' ती काही ओळखदेख नसताना सर्व सांगत होती. तशी ती ॲनिमिक वाटतच होती. साधा सुती पांढरा ड्रेस, लाल ओढणी, हातात एक पिशवी, डोईवर खुरटे केस पिनअप केलेले. आताही ती हे सांगताना हसत होती मधे मधे. आता तिचं हसू केविलवाणं वाटलं आम्हाला. लोकांची सहानुभूती मिळावी म्हणून ती खोटं हसू हसत होती. व्याख्यानाच्या सुरुवातीपासून पुन्हा पुन्हा मागे वळून ते का ते आता आमच्या लक्षात आलं.

''मला कोणाची मदत नाही. एकटीच जगतेय. हातावर पोट आहे माझं. मी पापड कुरडया मसाले विकते, झालंच तर साड्या, खोटे दागिनेही विकते. माझी तब्येतही बरी नाही. पोटात मोठी गाठ आलीय माझ्या. त्याचं ऑपरेशन करायला पाहिजेय. कुठून आणणार पैसे?'' तिनं एका दमात तिची सर्व परिस्थिती आम्हाला सांगून टाकली.

सर्वच बाजूंनी दैवानं तिची कोंडी केली होती. आभाळच फाटलं तर त्याला ठिगळं तरी किती लावणार! अशी परिस्थिती होती बिचारीची. आजचा वक्ता पर्सनली भेटणाऱ्या माणसांना यावर उपाय, नशीब बदलण्याचा, संकटांना सामोरं जाण्याचा मार्ग सांगणार, सुचवणारा होता. पण त्यासाठी फी पण जबरदस्त असणार. ही बाई काय देऊ शकणार ती! साधे रिक्षाला तिच्याकडे पैसे नव्हते.

''बाई काय विकता तुम्ही? आता काही आहे का तुमच्याकडे?'' तिला मदत करावी म्हणून मी विचारले. पिशवीत हात घालून एक कानातलं तिनं समोर केलं.'' आणखी काय आहे? ''नाही, आज आणखी काहीच नाही आणलं मी घाई घाईत आले ना!'' ''ठीक आहे हे घेते मी. उद्या इथे महिला मंडळ भरतं चार वाजता. चार ते सहा तेव्हा लवकर या तुमच्या सर्व वस्तू घेऊन. खपतील इथे. बऱ्याच बायका येतात मंडळात.'' ''अहो डोंबिवलीत जाते ना मी महिला मंडळातून विकायला. लोकल मधेही विकते.'' ती पुन्हा उसनं हसत म्हणाली. ''आता तुमच्याकडे आणखी काही असतं ना ते घेतलं असतं आम्ही.'' तिच्याबद्दल खरंच सहानुभूती वाटून मी म्हटलं. मैत्रिणीनंही दुजोरा दिला. 'उद्या आणीन' ती म्हणाली. 'चला निघु या, उशीर बराच झालाय.' आम्ही निघालो तीही निघाली. आमच्या उलट दिशेने.

उद्या ती आली की नाही माहीत नाही. कारण मला नंतर जमलंच नाही जायला. पण ती कशी आहे? तिचं काय झाल. असेल? असे तिच्याबद्दलचे विचार उगाचच मनात पिंगा घालत होते. मनाशी विचार केला असे किती जण असतात? आपण कुणा-कुणाला मदत करणार नि पुरे पडणार! ती कुठली कोण! तरीह पण बरेच दिवस झाले तरी तिच्याबद्दलचे विचार कधीतरी मनात येतच होते. 'करो जतन यापुढे प्रभूपिता अनाथा सदा' असं मी मनात म्हणत होते. असे लोक पाहिले की वाटतं आपलं सुख उगाचच दुखत असतं नाही का?

**श्रीमती आशा भिडे**
बी/९ विजय अर्पाटमेंटस्, आराधना
टॉकीजजवळ, ठाणे (प.) ४०० ६०२
दूरध्वनी - २५४१०१४० मोबाईल - ३२४०४४७६४

●●●

# दान

*निरपेक्षपणे दुसऱ्याला देणे, याचे आपल्या संस्कृतीत फार महत्त्व आहे. या दृष्टीने हे काही विचार – संपादक*

दान दिल्याने ते कमी होत नाही उलट त्यामध्ये अनेक पटीने वाढ होऊन आपणास परत मिळत असते. दान देण्याचे जसे अनेक मार्ग आहेत, तसे ते परत येण्याचेही अनेक मार्ग आहेत. देण्यात आलेले दान कोणत्या मार्गाने परत येते हे मात्र सांगता येत नाही. परत येते मात्र नक्की. म्हणून प्रत्येकाने आपल्या कुवतीनुसार किंवा क्षमतेनुसार गरजूंना दान केले पाहिजे.

काही वेळेस आपणांस असेही वाटत असते की, इतरांना दिलेले दान परत मिळत नाही. आज असे वाटत असले तरी ते खरे नाही. दुसऱ्यांना दिलेले दान अनेक पटींनी परत मिळत असल्यामुळे त्याला थोडा वेळ लागतो. आपण बँकेत काही रोख रक्कम ठेवली तर ती लगेच आपणास अनेक पटीत मिळत नाही. त्यासाठी काही कालावधी द्यावा लागतो. तरच ती रक्कम दुप्पट होते. असेच दानधर्माचेही असते. गरजूंना दान दिल्याने आपण एकप्रकारे पुण्यकर्मच करीत असतो. पुण्यकर्माची ठेव हीच खरी आपल्या आयुष्याची गुंतवणूक असते. आपण केलेली गुंतवणूक आपणास मिळाली नाही तरी ती काही काळाने आपल्या वारसास मिळत असते. ज्याप्रमाणे आपल्या मृत्यूनंतर आपली सर्व संपत्ती वारसास मिळते. त्याचप्रमाणे अशा पुण्याईची गुंतवणूकही आपल्या वारसांना मिळत असते. म्हणून आपली पुण्यकर्माची ठेव ही स्वच्छ असावी, चोरी किंवा लबाडी करून आपण दान केले तर त्याचे फळही तसेच आपल्या वारसांना मिळते.

वाईट मार्गाने जमा केलेले धन आपल्या पश्चात आपली मुले वाममार्गानेच खर्ची करतात हे आपण अनेकदा पहातो. म्हणून आपल्याजवळ गरजेपेक्षा जे जास्त आहे त्याचे आनंदाने वाटप करा मग पहा कसा चमत्कार घडून येतो. उपभोग घेतलेल्या संपत्तीच्या आनंदापेक्षा गरजूंना दिलेल्या दानाचा आनंद वेगळाच असतो. अशा स्वरूपाचा आनंद आत्मिक सुख देणारा असतो. माणसाजवळ फक्त दान देण्याची इच्छा पाहिजे. ज्याच्याजवळ धन नसते पण दान करण्याची इच्छा असते अशा व्यक्तीच्या मागे सरस्वती धनाची पेटी घेऊन उभी असते. अशावेळी आपण फक्त देत रहावे. म्हणून प्रत्येकाजवळ गरजूंना मदत करण्याची इच्छा असावी.

स्वत:जवळचे इतरांना दिल्याने केव्हाच संपत नसते; कालांतराने ते परत मिळते. परंतु आज आपण सर्वजण मी, माझे, मला, माझ्यासाठी या चौकटीच्या बाहेर पडून विचारच करत नाही. या चौकटीच्या बाहेर पडल्याशिवाय इतर जग हे आपणास दिसणारच नाही. आपण केवळ धन, दौलत, संपत्ती जमा करण्याचाच विचार करीत असतो. पैशाचा मोहच दु:खाचे खरे मूळ आहे. म्हणून आपणास खरा आनंद घेता येत नाही. शाश्वत स्वरूपाचा आनंद घेता येत नाही. शाश्वत स्वरूपाचा आनंद घ्यायचा असेल तर आपल्या कष्टाच्या कमाईपैकी काही हिस्सा गरजूंना जरूर दान करा. आज अशा अनेक व्यक्ती आहेत की, ज्यांच्याकडे खूप संपत्ती आहे पण तिचा उपभोग घ्यायला त्यांच्याकडे वेळ नाही. आणि इतरांच्याही उपयोगी पडत नाही. आपण जे काही धन जमा केले आहे ते धन थांबवून ठेवू नका. त्याचा आनंदाने उपभोग घ्या. माझ्याजवळील संपत्ती संपली तर मी काय करू? नंतर मला मिळेल की नाही? ही भीती मनात बाळगू नका. जमा केलेल्या संपत्तीचा विनियोग करा.

---

दुसऱ्याच्या नसलेल्या चुका शोधणे हे मूर्ख माणसाचे लक्षण आहे.

संपत्तीचा विनियोग केला नाही तर त्यामध्ये वाढ होणार नाही. जेवढी संपत्ती आहे त्यातच गुजराण करावी लागेल. त्यामुळे तुम्हाला कोंदटल्यासारखे वाटेल. पैसा जसा बाहेर जातो तसाच तो परतही येत असतो. पण पैसा परत येण्याचा मार्ग मोकळा ठेवला पाहिजे.

उदाहरण द्यायचे झाले तर विहिरीतील पाण्याचे देता येईल. विहिरीत जमा झालेल्या पाण्याचा आपण उपसा केला नाही किंवा वेळोवेळी त्यातील पाणी काढले नाही तर पाणी खराब होईल, त्यामुळे पिण्यासाठी आपणास शुद्ध पाणी मिळणार नाही. शिवाय विहिरीतील सर्व झरे पूर्ण बंद होतील. म्हणून पाण्याचा नेहमी उपसा करायला हवा. त्याचप्रमाणे आपण जमा केलेल्या धनाचे असते. आपण फक्त धन जमा करतच राहिलो तर त्याचा आपणास वापरही करता येणार नाही. म्हणजेच, ते धन उपयोगात आणता येणार नाही. असे निरुपयोगी धन काय कामाचे?

म्हणून आलेले धन केवळ साठवू नका. त्याचा गरजेनुसार वापर करा, भविष्याकरिता थोडी साठवणूक करा आणि उरलेले गरजूंना दान करा. शेतकरी शेतातील पीक घेतल्यानंतर ते सर्वच्या सर्व विक्री करीत नाहीत किंवा स्वत:च्या उदरनिर्वाहासाठी सर्व वापर करीत नाहीत. तर त्यापैकी काही हिस्सा पुन्हा बीज पेरण्यासाठी वापर करतात. पेरणी केलेल्या बीजातूनच त्याला पुन्हा हजार पटीने धान्य मिळत असते. म्हणून आपण आपल्या कमाईपैकी थोडे दान केले पाहिजे, म्हणजेच बीज पेरले पाहिजे. आणि हे बीजरूपाने केलेले दान तुम्हांला हजार पटींनी पुन्हा मिळेल याची खात्री बाळगा.

आपण सर्वजण स्वार्थाखेरीज कशाचा विचारच करीत नाही. आपल्याला जशी गरज पडते तशी दुसऱ्यांनाही पडत असते. दुसऱ्यांनी आपणास मदत केली तर आनंद होतो पण आपण दुसऱ्यांना मदत केली तर त्यांनाही आनंद होईल हे आपण विसरून जातो. आपल्या छोट्याशा मदतीने दुसऱ्याचे फार मोठे काम हलके होत असते, त्यांच्या डोक्यावरील भार कमी होत असतो याची आपण जाणीव ठेवायला हवी. पण आपण काय करतो, जर एखाद्या वेळेस दुसऱ्यांना मदत केली तर त्याचा सर्व हिशोब ठेवतो, केलेल्या उपकारांची त्याला वेळोवेळी आठवण करून देत असतो. मी तुझ्यासाठी एवढा खर्च केला, एवढी मदत केली वगैरे वगैरे...

थोडक्यात काय, तर दुसऱ्यांना आपण मदत केली किंवा थोडे सहकार्य केले तर त्या सर्व खर्चाचा हिशोब आपल्याजवळ तयार असतो. ताबडतोब खर्चाच्या डायरीत नोंदी लिहायला सुरुवात करतो. पण हाच खर्च आपण आपल्या आईवर, मुलावर किंवा पत्नीवर केला तर त्याचा हिशोब ठेवतो का? मग इतरांना थोडी मदत केली तर का म्हणून हिशोब आपण ठेवायचा? सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपण हिशोब ठेवणारे कोण आहोत? आपल्या संपूर्ण आयुष्याचा सर्व जमाखर्च हा परमेश्वराच्या मुनीमजीकडे तयार असतो. तोही अगदी एकदम चोख. त्यामध्ये एका पैशाचाही गोंधळ होत नाही. मग आपण हिशोब का म्हणून ठेवायचा? आपण फक्त नि:स्वार्थ भावनेने कार्य करीत रहायचे. आपण चांगले किंवा वाईट कार्य करतो त्या सर्वांची नोंद परमेश्वराच्या मुनीमजीकडे तयार असते. परमेश्वर आपल्या आयुष्यातील सर्व जमा खर्च कशा पद्धतीने ठेवतो हे पुढील एका उदाहरणाच्या सहायाने अधिक स्पष्ट करता येईल.

दोन मित्र रस्त्याने चालत होते. त्यापैकी एक असतो प्रामाणिक व दुसरा असतो अप्रामाणिक. रस्त्यावरून चालत असताना त्यांना पैशाने भरलेले एक पाकिट रस्त्यावर पडल्याचे दिसून येते. जो अप्रामाणिक मित्र असतो त्याच्या मनात हलचल सुरू होते. तो ते पाकिट उचलतो आणि खिशात घालतो. पैशाने भरलेले पाकिट सापडल्यामुळे तो खूष होतो. पण दुसरा जो प्रामाणिक मित्र होता त्याला ते

सहन झाले नाही. त्याने त्या अप्रामाणिक मित्राला सांगितले, अरे हे बघ तु हे जे पाकिट घेतले आहेत ते बरोबर नाही. ज्याचे पाकिट पडले आहे त्या व्यक्तीला किती अस्वस्थ वाटत असेल, त्या पैशासाठी त्यांनी किती मेहनत घेतली असेल, किती स्वप्ने पाहिली असतील? आपण असे करू हे पाकिट पोलीस स्टेशनमध्ये जमा करू म्हणजे ज्याचे पडले आहे त्याला ते पुन्हा मिळेल. पण दुसरा मित्र काही ऐकत नव्हता. त्याच्या मनात लोभ निर्माण झाला होता. हे कलियुग आहे, या कलियुगात खऱ्याची दुनिया नाही असे तत्त्वज्ञान उलट तो सांगू लागला. शेवटी नाईलाज म्हणून प्रामाणिक मित्र गप्प राहिला.

तात्पर्य काय तर, जो अप्रामाणिक मित्र असतो तो पूर्वी खूप प्रामाणिक होता. त्याच्या प्रमाणिकपणाचे फळ म्हणून त्याला भविष्यात खूप धन मिळणार होते पण त्याच्या सध्याच्या अप्रामाणिकपणामुळे आणि अतिलोभामुळे त्याला एका पाकिटातील पैशावर समाधान मानावे लागले. थोड्याशा लोभामुळे भविष्यातील मिळणारी मोठी रक्कम त्याने गमावली. अप्रामाणिक मित्राला वाटत असते की, जगात एवढी लोकसंख्या असताना परमेश्वर आपल्याकडे कशाला लक्ष देईल. पण त्याला हे माहीत नसते की, आपण चोरून कितीही अंधारात जाऊन किंवा एकांतात बसून आपल्या मोबाईलवरून दुसऱ्यांना फोन केला, तर जो बील पाठवणारा असतो तो बरोबर आपल्या पत्यावर अचूक बील पाठवून देत असतो. हे आपण लक्षात घेत नाही. परमेश्वराकडे आपल्या आयुष्याचा एवढा अचूक जमाखर्च असताना आपण काय म्हणून वेगळ्या नोंदी ठेवायच्या? अशा हिशोब ठेवण्याने आपण आपल्या आयुष्यातील बराच वेळ व्यर्थच घालवत असतो.

दान हे केवळ पैसे किंवा धन देऊनच केले जाते असे नाही. दान अनेक प्रकारे केले जाते. उदा. प्रेमदान, रक्तदान, अन्नदान इ. प्रकारेही आपणास दान करता येते. जर आपल्याजवळ दुसऱ्यांना देण्यासाठी काही नसेल तर आपण दुसऱ्यावर नि:स्वार्थ भावनेने प्रेम केले तरीही ते दानच असते. दु:खी व्यक्तीच्या पाठीवरून प्रेमाने हात फिरवून तिला जीवन जगण्याची स्फूर्ती दिली तरीही ते एक प्रकारचे दानच असते. ज्ञानाची भूक लागलेल्या व्यक्तीला ज्ञानदान केले, त्याचप्रमाणे भूक लागलेल्या व्यक्तीला घासभर खाण्यासाठी अन्न दिले तरी ते दानच ठरते. अन्नदान केल्याने लोकांना विषबाधा झाली तर ते पाप ठरते. म्हणून अन्नदान चांगले करावे. शिळे किंवा उष्टे अन्न दुसऱ्यास दिले तरी ते पापच होय. काय व कसे दान करायचे हे प्रत्येकाने ठरवायला हवे. म्हणून तर सदगुरु वामनराव पै म्हणतात, दानधर्म करायचा आहे किंवा करायचा नाही हे तू ठरवायचे आहेस कारण तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार.

**श्री. यशवंत माने**
अबोली, बी – १०३,
सुभाष रोड, कुंभारखान पाडा,
डोंबिवली (प.), जि. ठाणे

●●●

दि
शा
नियमित
वाचा.

*आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.*

कलाकृती निर्मात्यापेक्षा मोठी होऊ शकत नाही. – व. पु. काळे

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*या विषयावरील लेखांत आलेल्या विचारांचा मागोवा जून, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर २००९ च्या अंकात घेत आहोत – संपादक*

**प्रास्ताविक :**

दिशाच्या ऑगस्ट २००९ च्या अंकात आपण ठरविले होते कीं '**देवशिल्प**' व '**मानुषशिल्प**' ह्या दोन संकल्पनांचा मागोवा पुढच्या अंकात घेऊं या. ह्या दोन्ही संकल्पना डॉ. निहार रंजन राय यांनी पुनरुज्जीवित केल्या. पण महत्त्वाचे हे की त्यांचा (पौराणिक किंवा वैदिक) संबंध, 'ऐतरेय ब्राह्मणात मिळावा.

आता आपण ह्या 'शिल्पांचा अक्षर संबंध' व अतुट नाते हे अजिंठा, वेरूळ, एलोरा, खजुराहो वगैरे भारतीय शिल्पांशी कसा जोडला गेलेला आहे, हे पाहू या.

**'वास्तुसूक्त उपनिषद' अलिस बोनर :**

एव्हढेच नव्हे तर '**वास्तुसूत्र उपनिषद**' ऐतरेय ब्राह्मण, अथर्ववेद, छांदोग्य, बृहद्अरण्यक वगैरे वेद ज्ञानावर आधारिक उपनिषदांशी जोडला गेलेला आहे हे पण पाहू या.

आपली ही जगद् विख्यात 'शिल्पे' केवळ '**सौंदर्य – अधिष्ठित**' मानुष शिल्पे नसून, ती ह्या गूढ विश्वातील **'अव्यक्त' जग व 'व्यक्त' जग ह्यांचा संबंध दाखविणारी व त्यांची परस्पर अवलंबितता दाखवणाऱ्या प्रतीकांची एक प्रभावी प्रयोगशाळा** आहे. हे सुद्धा पाहू या.

तुम्हांला आश्चर्य वाटेल, पण ह्या सध्याच्या भारतीय जनमानसाला स्वत:च्या संस्कृतीचा खरा परिचय विस्मृतीत गडप झाल्याने, एका विदेशी स्त्री शिल्पकरणीने ही नाती उलगडून दाखवण्याची किमया केली, याचे छोटेसे दर्शन येथे घडवणार आहे. त्यापाठीमागी स्पिरीच्यूअर सायन्सची भूमिका नंतर तपासूच!!

ह्या स्त्री शिल्पकारणीचे नाव आहे **अलिस बोनर (Alice Boner, 1889-1981)** ही एक **स्वीस आर्टिस्ट** व विदूषी होती. वाराणशी, भारत ही तिची कर्मभूमी १९३६ ते १९७८ पर्यंत होती. तिचा विख्यात भारतीय नृत्यकार



**अलिस बोनर**

**उदय शंकर** ह्याच्या नृत्य कला कामगिरीशी जवळचा संबंध होता. १९२७ ला भेट झाल्यावर, त्याच्याबरोबर १९३० साली, तिचे भारतात आगमन झाले. त्यानंतर वाराणशीला एका जुन्या घरांत '**असी घाटावर**' तिचे १९३५ पासून वास्तव्य होते. त्या काळांत तिने पेंटींग्जचा ध्यास घेतला व भारतीय पुराणातील (Mythology) मधील '**सृष्टी, स्थिती व प्रकृती**' किंवा '**प्रकृति,**



**विश्वरूप व काल**' ह्या विषयावर तिने संशोधन करून स्वत:ची '**Triptych**' ही पेंटीग्ज चितारली. ही पेंटीग्ज तिच्या इतर चित्रांबरोबर बनारस शहरी बनारस हिंदू युनिव्हर्सिटीच्या भारत कला भवनच्या 'कॅपरूममध्ये' (Musium of Fine Art) एका खास दालनात मांडली आहेत.

**शिल्पकृतीची वैशिष्ट्ये :**

आपण या कामगिरीची तत्वज्ञानातील, वेदिक स्पिरीच्यूऑलिटीतील दखल इथे न घेता, दिशाच्या आगामी काही अंकातून विस्मृतपणे अभ्यासणार आहोत. इथे फक्त तिच्या कामगिरीची अल्पशी माहिती मांडणार आहोत.

१) हिंदू शिल्पशास्त्रातून निर्मीलेल्या कलाकृतींचे रचनाचातुर्याचे गूढ फॉम्यूले व संकेत.

२) त्या कृतीमधील **Space division of Measure and Time Division of Measure** म्हणजे दिशा, आकार, वास्तू याचे मापनशास्त्र व त्यांचेच कालमापनशास्त्र हे रेषा, त्रिकोण, भूमिती ह्याच्या सहाय्याने कसे बांधले गेले आहे हे बघणे व अभ्यासणे.

३) ह्या कलाकृतीमार्फत **प्रतीक, प्रतिमा** ह्यांच्या सांकेतिक गूढ रचनांतून **प्रत्यक्ष आध्यात्मिक स्तरावरील शक्ती देव, देवता यांचा साक्षात्कार** कसा होऊ शकतो याचे दर्शन व अभ्यास.

'अलिस बोनरची गाठ नंतर श्री. सदाशिव रथ शर्मा या एका मंदिराच्या शिल्पशास्त्रात प्रसिद्ध असलेल्या ओरिसामधील शिल्पशास्त्रज्ञाशी पडली व तिने '**शिल्प प्रकाश**' ह्या संस्कृत ग्रंथावर भाष्य लिहीले. ह्या व अशाअनेक कामगिरीवर तिला **भारताच्या राष्ट्रपतीकडून १९७४ मध्ये पद्मभूषण हा बहूमान देण्यात आला. झुरिच युनिव्हर्सिटीकडून तिला डॉक्टरेट पदवीही मिळाली.**

तुम्हांला सहाजिकच प्रश्न पडेल की 'भारतीय संस्कृती बीज, मॉडेल व साधन' ह्या आपल्या 'दिशा ऑनलाईन' विषयाशी ह्या वर्णनाचा संबंध काय?

आपल्याला हा प्रश्न पडण्याचे कारण हे आहे की, आपण आपल्या कॉंशसनेसच्या अत्यंत प्राथमिक स्तरावर व भूमिकेवर जवळजवळ **प्राणिजीवन स्तरावर** आहोत. त्यामुळे, शिल्पकला, नृत्यकला, संगीतकला व आयुर्वेद सुद्धा यांचा वैश्विक रचनेशी काय संबंध आहे, हे आपण पाहू शकत नाही.

पण, ह्या सर्व कला व शास्त्रे ह्यांचा मूळ आधार बीज संकल्पना ह्या वेद ज्ञानावर आधारलेल्या आहेत.

बरेच वेळा भारतीय संस्कृतीचे स्तुतीपाठक अशी विधाने स्वत: करतात किंवा थोर विचारवंतांची विधाने

उद्‌धृत करतात. पण, इथे थांबून चालणार नाही. ह्या कलांच्या वेगवेगळ्या स्वरूपांत प्राविण्य मिळवलेले कलाकर, जेव्हां त्या कलेच्या बीजमंत्रांचा आधाराचा तलास घेतात तेव्हा त्यांना जी समीकरणे सांपडतात ती विश्वरचनेच्या मूलभूत तत्वांशी व संकल्पनेशी बीज रूपाने बांधलेली असतात.

ह्याचा दुसरा महत्वाचा भाग म्हणजे ह्या एक एका स्तरावर ह्या कलांचा सोपान (Ladder) पद्धतीने अविष्कार व अनुभूती व आनंद घेताना तुम्ही एका वैदिक ज्ञानाच्या साक्षात्कारी ज्ञानाचा उंबरठ्यावर उभे असता हे आपल्याला उमगत नाही.

मग, येथून परत भौतिक जगात किंवा प्राप्तीजीवनाच्या भूमिकेवर उतरण्याऐवजी जर आपण एक पाऊल ह्या उंबरठ्यापलीकडे टाकलेत, तर-तर अध्यात्मशास्त्राच्या अवाढव्य, गूढ व अनाकलनीय दालनात तुमचा प्रवेश झाला असे समजा. पुन्हा सांगतो की सर्वसाधारण माणसे ह्या उंबरठ्यावरून रबर बँडला बांधल्यासारखे खेचून मागेच वळतात. इथे नवीन अनुभवात झोकून देण्याची साहसक्रिया केली जात नाही. मग, ही साक्षात्कारी ज्ञानाची दालने ह्या जीवनांत बंद दाराच्या व संशयाच्या आडच रहातात!!

आपण म्हणूनच ह्या एका नवीन दर्शनाचा प्रत्यय दिशाच्या पुढील अंकातून घेणार आहोत.

**मागील लेखांचा आढावा :**

पण ह्या अंकात मात्र आपण माझ्या गेल्या काही वर्षातील लेखांचा आढावा पुढे चालू ठेवणार आहोत.

**दिशा अकं :**

**जानेवारी २००८ पृष्ठ क्र. १४-१९/४० :**

पृष्ठ क्र. १४ – वेदज्ञानाबद्दल 'इश्वर निश्वासित' आधाराबद्दल '<u>संशय निवृत्ती</u>'
- व्यास – महाभारत
- याज्ञकल्क्य स्मृती
- सांख्य शास्त्र

पृष्ठ क्र. १५ – यज्ञ संकल्पना

पृष्ठ क्र. १८ – ऋग्वेदातील व इतर वेदातील शुन:शेप आख्यान – त्याचे गूढ ज्ञान आत्म्याचे पाश व मुक्तता.

**फेब्रुवारी २००८ पृष्ठ क्र. १४ – २५ :**

पृष्ठ क्र. १४ – अर्थ-गर्भ, शुन:शेप आख्यान, अलौकिक यज्ञकृति

पृष्ठ क्र. १५ ते २५ – ढोबळ आख्यान

हरिश्चंद्र – नारद प्रश्नोत्तरे
- 'जाया – पती पुत्र म्हणून जन्माला येतो
- पुत्र – म्हणजे काय?
- पशु संभोग व विवाह फरक
- राजसूय यज्ञ क्रिया
- स्पिरीच्यूअल विद्येचा अधिकारी
- अर्थ लावण्याच्या पद्धती
- आख्यानातील संकल्पनांचा क्रमवारी अर्थ
- पशुवृत्तीचा बळी (पशूचा नव्हे)
- महायोगी अरविंद अर्थ पद्धती
- आख्यानाचा मतीतार्थ – आत्मपाशाचा अर्थ व मुक्तता.

विशेष चित्र – पृष्ठ क्र. ४१ ''अफगाणिस्तानातील 'उर्ध्वरेत गणपती''

**मार्च २००८ पृष्ठ क्र. १९–२८ :**

पृष्ठ क्र. – ऋषी म्हणजे एक अर्थ 'उर्ध्वरेते मानव' असा सुद्धा आहे.

उर्ध्वरेत मानव – 'कामविकारास ताब्यात ठेवल्यास ग्रंथीतून निघणारा द्रव शरीरातच रिचविला जाऊन आरोग्य संपन्नता येते.

तो द्रव उच्च प्रकारात परिणीत होतो. अशा लोकांना उर्ध्वरेत म्हणतात, कारण यांचे रेत व रज अर्धामार्गाने शरीराबाहेर पडण्याऐवजी उर्ध्वाभिमुख होते.

– स्वामी विष्णुतीर्थ महाराज, देवास, 'देवात्मशक्ति'.

पृष्ठ क्र. १९/२० – Cognitive Evolution Pleistocene - Archeology stage वैशिष्ट्य.

माणूस स्वत:च्या अस्तित्वाचे सत्य जाणण्याचे प्रश्न स्वत:लाच विचारू लागला.

कुंडलिनी शक्ति जागृति – वेद संहिता निर्मिती.

शुन:शेप आख्यान – ऋग्वेद व इतर वेद

सोम म्हणजे काय? ऋग्वेद (१/२८/५–८)

पृष्ठ क्र. २१ – योगी गोपीकृष्ण व 'Kandahni Research Institute' निशान, (काश्मीर) न्यूर्याके

पृष्ठ क्र. २२ – सोमरस व आर्य वेदिक संस्कृति पवमान सुक्त व अस्थवामीय सूक्त

श्येन पक्षाने स्वर्लोकीचा सोम पृथ्वीलोकी आणला.

पृष्ठ क्र. २५/२६ – १३२ वैदिक विद्यांची यादी

पृष्ठ क्र. २६ – आत्म्याचे पाश

पृष्ठ क्र. २७ – पिंडात सोमरसाची प्राप्ति

पृष्ठ क्र. २८ – भारतीय संस्कृतीतील अस्पष्ट खुणा पृथ्वीवर, भारतात, हिंदू समाजाला व भोग संस्कृतीला 'सोयर सुतक' नाही. ही खरोखर 'कवच कुंडले' – भारतीय संस्कृतीची.

**एप्रिल २००८ पृष्ठ क्र. २३ – ३० :**

पृष्ठ क्र. २३ – शुन:शेपची यज्ञ धडपड माझी मांडणी Santosh Krinskey - American Spiritualist लोटस लाईट पब्लिकेशनस् (विल्मोस्ट) U.S.A. योगी अरविंद व मदर यांच्या.

New consciousness संकल्पना व चळवळीचे पुरस्कर्ते.

'Concept of Soma' (P III Versathle Genius Sri. Kapali Shastriar - 1986, Dipti Publications, Pondicherry - 6055002)

'ज्यांना सत्य अनुभूती प्राप्त करावयाची आहे - सोमसिद्धी आवश्यक'

सुश्रुत संहिता अध्याय २९ हा सोम संकल्पनेला वाहिलेला आहे.

ऋग्वेद मंडल १०.८५.३ फक्त ब्राह्मण किंवा ऋषीचा सोम जाणतात, ते दुसरे कोणीही पिऊ शकत नाही.

''सोम यं ब्रह्मणो विदुर्म तस्थाश्नाति कश्चन।''

आर्य समाज, डॉ. चित्राव शास्त्री

पृष्ठ क्र. २७ - सोमाचा माझा अर्थ - स्वामी विष्णूतीर्थ - उत्पत्ति चक्राशी जोडला आहे.

पृष्ठ क्र. २९ - सोमप्राप्ति व वेदांचा अर्थ

सांस्कृतिक अध:पात व अध:पतन

**मे २००८ पृष्ठ क्र. २२-२८ :**

पृष्ठ क्र. २२ - डॉ. शांताराम आपटे - 'वैदिक आन्हिक' श्री. शंकर मठ - 'भारत वर्षाची सांस्कृतिक घडण' - दोन पुस्तकांचे प्रसीद्धीकरण दोघेही स्पिरीच्यूअल सायन्स सेंटर, ठाणे यांचे सदस्य.

पृष्ठ क्र. २३ - वैदिक अशी संस्कार व संस्कृती

पृष्ठ क्र. २५ - पॉल डेव्हिस - The mind of God Godel's theorom - Man's gaining absolute knowledge - unlikely

Thomas Kunh - Paradigm shift

Feyer Band - 'I object to the claim that science is superior to other modes of knowledge.

डॉ. आपटे - न्यास विद्या

पृष्ठ क्र. २७ - भौतिक समाजशास्त्रांची गल्लत.

पृष्ठ क्र. २८ - सामाजिक भौतिक धर्म, समधर्म, समभाव व सनातन धर्म

**जून २००८ पृष्ठ क्र. २८-३५ :**

पृष्ठ क्र. २८ - Integral Spirituality

विद्या - अविद्या

न्यासविद्या - दुर्गाशक्ति साधना

करन्यास - नवार्ण मंत्र

स्पंद - सोनेग्राफी यंत्र

पृष्ठ क्र. ३० - स्पंदशास्त्र व मंत्रशास्त्र

पृष्ठ क्र. ३१ - Vital, psychic, spiritual sir, John wolldrofte (Arthur Avalon)

The centres of consciousness.

महायोगी अरविंद

Overmind Gnosis, gradation Diagram

पृष्ठ क्र. ३२ - ऋग्वेदातील शुन:शेप आख्यानाचा संदर्भ

पृष्ठ क्र. ३४ - खजूर झाड २००० वर्ष जुने बीज (इस्त्राएल) मध्ये सापडले.

श्री. लालकृष्ण अडवानी यांनी

क्रोध हा मधमाशीच्या मोहोळावर मारलेल्या दगडासारखा असतो.

केलेला यज्ञ – काम्य यज्ञ – म्हणजे काय? हा काही आत्म यज्ञ नव्हे!!

**जुलै २००८ पृष्ठ क्र. १६–२६ :**

पृष्ठ क्र. १६ – अस्पष्ट यज्ञ संकल्पना

सोनिया गांधी – महाकाल मंदिर उज्जैन

पृष्ठ क्र. १७ – पर्जन्य यज्ञ. यज्ञ एक भौतिक यंत्र?

वैदिक यज्ञ संकल्पना व शास्त्र

स्वामी डॉ. सत्यप्रकाश सरस्वती, आर्य समाजिस्ट

पृष्ठ क्र. १९ – श्रृती हे संस्कृतीचे बीज ''Safe storage for crucial plant genes.''

बीज जनन योजना – [Times of India 23-06-2008 पृष्ठ क्र. १७] फोटो

पृष्ठ क्र. २१ – यज्ञ कोणती बीज संकल्पना?

नासदीय सूक्त, सृष्टी उत्पत्ती सूक्त. सृष्टीपूर्व प्रलयावस्था, जीवनिर्मिती कोण या सुक्तांचे रचनाकार?

पाश्चात्य संस्कृतीतील संकल्पना – तुलनात्मक अभ्यास.

पृष्ठ क्र. २२/२३ – Martin Harnsit - Astrophsicist "Astronomy is an essentially passive activity"

पृष्ठ क्र. २३ – Otto Rossler - German Theoretical Bio chemist - His spech 1970 - limits of scientific knowledge.

वेदिक ऋषींची ह्या मर्यादेवर मात.

**ऑगस्ट २००८ पृष्ठ क्र. १५–१९ :**

पृष्ठ क्र. १५ – End of science - John Horgan [Brodway Books - 1997 ISBN. 0553-06174-7 (pbk)]

नवीन बीज निर्मितीची असमर्थता

पृष्ठ क्र. १६ – महायोगी अरविंदांची 'सावित्री' महाकविता व मृत्यू संकल्पना

Cosmic Reality - भौतिक शास्त्रांची असमर्थता

पृष्ठ क्र. १८ – विषयाच्या ज्ञानाचा आदि व अंत.

वैदिक ज्ञानाचे सामर्थ्य व पूर्णता.

**सप्टेंबर पृष्ठ क्र. १५–१८ :**

पृष्ठ क्र. १५ – वैश्विक शक्तिचे तीन पदर – त्रिकोण इच्छा, ज्ञान, क्रिया

शक्ति अंक – कल्याण मासिक

पृष्ठ क्र. १६ – वैशिष्ट्यपूर्ण प्रश्नोपनिषद

पृष्ठ क्र. १८ – The Speaking Tree – न्यग्रोध (वड)

**ऑक्टोबर २००८ पृष्ठ क्र. १२–१७ :**

पृष्ठ क्र. १२/१३ – स्वामी डॉ. सत्यप्रकाश सरस्वती (आर्य समाज) ''बीज से अंकूर; अंकूर से तना, तने से वृक्ष का शरीर, उससे फूल और फूल और फल में फिर बीज'' सृष्टि रचना के प्रत्येक चरण मे जीवों के कल्याण की भावना लिहीत है।''

"इश्वरी चेतना शक्ती ही काही जीवन उद्दिष्टे घालून देते – बीज संकल्पनेतून – व त्या बरहुकूम विकासाची दिशा व हेतू स्पष्ट होतो."

पृष्ठ क्र. १३ – नास्तिकांच्या भौतिक विज्ञानवादाच्या बाजूची तर्कपद्धती व गृहीते. Atheist side of Logic and Assumptions

पृष्ठ क्र. १५ – New Biology

Maturaua and Varela - १९७२ Autopoiesis ही संकल्पना मांडली

भगवद्गीता – "उद्धरेदात्मना ऽऽ त्मानं नामात्मानम व सादयेत।

आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मै वा रिपुरात्मना।।५।।

पृष्ठ क्र. १६ – Rupert Sheldrake - New Science of Life

- 100 Monkey Principle

- Mr. Vladimir Dimitrov - ऑस्ट्रेलियन विचारवंत Autopoesis and spirituality.

**नोव्हेंबर २००८ पृष्ठ ९–११ व २७ :**

पृष्ठ क्र. ९ – Structural Determinism and Structural Coupling

स्वरूपाच्या रचनेतील पूर्वनिश्चितता आणि त्यांची जोडणी.

इ) अंतर्गत सूक्ष्मात स्वत:च्या सामर्थ्याबरहुकूम जेव्हढा बदल कराल तेव्हढ्या प्रमाणांत बाह्य जड विश्वात बदल घडेल.

ई) सगळया विश्वातील स्पिरीच्यूअल, आध्यात्मिक पातळी उंचावण्याची क्रिया ही एक प्रत्येक जीवसृष्टीतील प्राण्याच्या जीवात्म्याच्या परस्पर सहकार्याची क्रिया होय.

"Why is it difficult to conquer sex? Because, it has been kept out of the domain of cousciousness."

- Yogi Aurobindo.

**डिसेंबर २००८ पृष्ठ क्र. १९–२३ :**

पृष्ठ क्र. १९ – ब्राह्मण वृक्ष – न्यग्रोध (वड) पळस वृक्ष – उपनयन – मेधाशक्ति

भारतीय संस्कृतीचे बीज व युगानुयुगे प्रवाहाची योजना.

पृष्ठ क्र. २० – स्वामी दयानंद – १६ संस्कार क्रिया

– दैशिक शास्त्र – श्री १०८ सोंबारी महाराज

पृष्ठ क्र. २१ – भारतात जन्म हा दैवी निर्णय भागवतातील पुरावा.

Cultural Manifestations - कालीदास, हरीशास्त्री, भरत मूनी The Gods of India – त्रिमूर्ती

– अधनारीश्वर – कुंभकोणम

- The Mother (pundicherry) in front of India Map.

असे कोणते मोठे गुण ह्या भारतीय संस्कृतीत आहेत कीं तिच्या शुद्ध प्रसाराबद्दल आपण जागृत रहावयाला हवे?

**जानेवारी २००९ पृष्ठ क्र. २२–२७ :**

पृष्ठ क्र. २२ – जन्मसंकल्पना ही मॅथमॅटिकल, स्टॅटिस्टिकल प्राबेबिलीटी नव्हे.

'भारतीय संस्कृति' – ग्रंथ व डॉ. निहार रंजन राय – आमुरद निंबध

पृष्ठ क्र. २३ – ऐतरेय ब्राह्मण – शिल्पकर्म, कृष्टि संकल्पना.

पृष्ठ क्र. २४ – संस्कार विधी – स्वामी दयानंद वर्णित १६ संस्कार – चार प्रकारांनी होणारे १. जन्मांतर, २. सहज, ३. कृत्रिम, ४. अन्वयागत.

**फेब्रुवारी २००९ पृष्ठ क्र. १७–२२ :**

पृष्ठ क्र. १७ – संस्कृतिच्या विस्ताराचे, उगमाचे बीज

स्पिरीच्यूअल प्रोग्रॅम

ऐतरेय ब्राह्मणातील दाखला. देव शिल्प, मानुष शिल्प.

पृष्ठ क्र. २० – डॉ. निहार रंजन राय आणि रविन्द्रनाथ टागोर "संस्कृति का कृष्टि?"

कुल व शील निर्मिती व संवर्धन.

स्वामी दयानंद व योगी अरविंदांचे कार्य

**मार्च २००९ पृष्ठ क्र. १५–१८ :**

पृष्ठ क्र. – बंकिमचंद्र चटर्जी व बंगालमधील अनुशीलन समिती

शील कभी भी स्थिर रूपमे नही रहता
– डॉ. निहार रंजन राय

उदाहरणासाठी काही चित्रे –

अजंठा, चैल हॉल, सुंदर स्त्री विवस्त्र होताना, शिल्पांची संध्या भाषा, Erotic Sculptured, nude मायकेल अँजेलो

'Birth' – 'प्रजनन'

ओरिसा डान्सर (देवशिल्प), मायकेल अँजेलो, बहाई देऊळ

**एप्रिल २००९ पृष्ठ क्र. २४ –२७ :**

पृष्ठ क्र. – वेदिक सत्य

पृष्ठ क्र. २६ – कुल शील – निर्मिती व जोपासना

**मे २००९ पृष्ठ क्र. १४–१८ :**

पृष्ठ क्र. १४ – सौंदर्य दृष्टी कुठून पैदा होते?

भारतीय संस्कृतीतील कुल शील संकल्पना हा झरा कोठून उगवला?

पृष्ठ क्र. १७ – संस्कृतीचा शास्त्रीय दृष्टीकोन कोणता?

पृष्ठ क्र. १८ – युगानुकूल बदल – नक्की काय?

**जून २००९ पृष्ठ क्र. ११–२१ :**

पृष्ठ क्र. ११ – संस्कृतीचे एकांगी दर्शन

ऋषीचे कुळ व नदीचे मूळ

पुराणे ह्या भौतिक बखरी नव्हेत!!

तो आगम ज्ञानाचा इतिहास आहे.

पृष्ठ क्र. १५-२१ - माझ्या लेखमालेचा संदर्भ आढावा भाग १ जून २००४ - सप्टेंबर २००५

**जुलै २००९ पृष्ठ क्र. १८-२६ :**

पृष्ठ क्र. १८ - भारतात जन्म, Earth in upheaval, continental Drift

कुल-शील - देवशिल्प, मानुष शिल्प

वास्तुसूत्र उपनिषद - अलिस बोनर बनारस हिंदु विद्यापीठ

पृष्ठ क्र. २०-२६ - माझ्या लेखमालेचा संदर्भ आढावा - भाग २ - जानेवारी २००६ - एप्रिल २००७

**श्री. यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी - २५३६८४५०
मोबाईल - ९००४०५१८४७
E mail : Saneyr@mtnl.net.in

●●●

## *विविध देशांचे शिक्षकदिन*

***चीन** : कॉन्फ्युशिअस यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ २७ ऑगस्टला साजरा केला जातो. नॅशनल सेंट्रल युनिव्हर्सिटीने १९३१ मध्ये ही शिफारस केली होती.*

***रशिया** : ५ ऑक्टोबर १९९४ पासून शिक्षकदिन साजरा केला जातो. पूर्वी सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या रविवारी हा दिवस साजरा केला जायचा.*

***अमेरिका** : मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात विविध कार्यक्रम घेऊन हा उत्सव साजरा केला जातो.*

***थायलंड** : १६ जानेवारी १९५७ पासून हा दिवस साजरा केला जातो.*

***इराण** : २ मे १९८० पासून हा दिवस सजारा केला जातो.*

***तुर्की** : २४ नोव्हेंबरला सुटी न घेता हा दिवस साजरा केला जातो.*

***मलेशिया** : सुटी न घेता १६ मे ला हा दिवस साजरा करतात.*

●●●

***हे ईश्वरा, सर्वांना सुखात, आनंदात ठेव. त्यातच माझे सुख सामावले आहे.***

***- एक प्रार्थना.***

पुस्तक परिचय

# धगधगते यज्ञकुंड : वि. दा. सावरकर

नावात काय आहे? असं आपण नेहमी म्हणतो. परंतु प्रस्तुत पुस्तकाच्या शीर्षकातच स्फुल्लिंग, आवेश, वीरश्री या भावना तर आहेतच पण त्याचबरोबर देशाभिमान, चैतन्य आणि पावित्र्य या देखील आहेत. लेखकाने 'यज्ञकुंडा' ची उपमा सावरकरांना दिली आहे. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी, देशाच्या अखंडतेसाठी यज्ञवेदीवर ज्यांनी स्वत:ची आहुती दिली, स्वत:ला समर्पित केलं, हौतात्म्य पत्करलं त्या स्वातंत्र्यदेवतेच्या मुक्ततेसाठीचे हे 'यज्ञकुंड' आहे. त्याचबरोबर काही नामविशेषणं अशी आहेत की जी नुसती उच्चारली तरी त्या अलौकिक, असामान्य, अतिश्रेष्ठ व्यक्तींचं कार्यकर्तृत्व, गुणविशेष नजरेसमोर येतात. काही उदाहरणांवरून याची सत्यता आपल्या लक्षात येईल. 'महात्मा' शब्द उच्चारताच गांधी, जोतीबा फुले यांची नावं, त्यांचं कार्यकर्तृत्व नजरेसमोर येतं. 'लोकमान्य' म्हणताच टिळकांच तर 'सरदार' म्हटल्यावर वल्लभभाई पटेल आठवतात. 'क्रांतीसिंह' संबोधताच नाना पाटील तर 'सेनापती' म्हणताच बापट आठवतात. तद्वतच् 'स्वातंत्र्यवीर' हे विशेषण उच्चारताच एकमेवद्वितीय नाव नजरेसमोर येतं ते 'सावरकरांचं'. त्यांच अलौकिक कार्यकर्तृत्व मन:पटलावर येतं; इतकी ही विशेषणं नावाशी तादात्म्य पावलेली आहेत. किंबहुना ती नावाचाच अविभाज्य घटक बनली आहेत. खरं तर ही उपाख्य, विशेषणं जनतेने, थोर साहित्यिकांनी, विद्वानांनी त्या कर्तृत्ववान मान्यवरांनां उत्फूर्तपणे बहाल केलेली आहेत.

पाच दशकाहून अधिक काळ पत्रकारितेचा प्रदीर्घ आणि समृद्ध अनुभव पाठीशी असलेले निर्भीड पत्रकार, लेखक श्री. श्रीकांत नेर्लेकर यांनी हे पुस्तक लिहिले आहे. एक सच्च्या 'स्वयंसेवक', शुद्ध व स्वच्छ मनाचा, प्रामाणिक, अजातशत्रू, सर्वात मिसळण्याचा स्वभाव, शिस्तप्रिय असं विविध पैलू असलेलं व्यक्तिमत्त्व म्हणजे श्रीपाद वामन नेर्लेकर हे ठाणेकरांना सुपरिचित आहेत. विशेषत: विद्यार्थ्यांची तरुण पिढी नजरेसमोर ठेऊन त्यांनी हे पुस्तक लिहिले आहे. जहाल, सशस्त्र क्रांतिकारक, प्रखर देशभक्त, समाजसुधारक, लेखक, महाकवी, थोर साहित्यिक, विलक्षण बुद्धिमान, उत्तम वक्ता, नाटककार असे विविधांगी, अष्टपैलू व्यक्तिमत्त्व स्वातंत्र्यवीरांचं होतं. आचार्य अत्र्यांनी त्यांनी गणना 'महापुरुषात' केली आहे. क्रांतिकारकांचे कुलपुरुष म्हणून इतिहासावर स्वत:ची चिरस्थायी नाममुद्रा उमटवणाऱ्या सावरकरांचे संपूर्ण आयुष्य म्हणजे 'आधुनिक महाभारत' असंच म्हणावे लागेल, इतके ते चैतन्यदायक बनले आहे. त्यांचा 'अठराशे सत्तावन्नचे स्वातंत्र्य समर' हा ग्रंथ सर्व क्रांतिकारकांना वंदनीय आणि प्रेरणा देणारा आहे.

प्रस्तुत पुस्तकाला मानवंदना देताना विक्रम सावरकर म्हणतात, 'अखंड हिन्दुस्थानची प्रेरणा देणारे चरित्र', असा उल्लेख त्यांनी केला आहे. मानवंदनेतील विचार उमलत्या देशभक्त युवापिढीली समजलेच पाहिजेत, तरच स्वातंत्र्यवीरांना अभिप्रेत असलेला अखंड, सर्वांगीण, बलसंपन्न हिन्दुस्थान निर्माण करण्याची यशदायी प्रेरणा त्यांना मिळेल.

'महारथी कर्णाला जशी जन्मत: कवच कुंडले होती तशी देशभक्तीची कवचकुंडले व पारतंत्र्याची चीड सावरकरांना जन्मत:च होती. असा महापुरुष युगायुगातून एखादा जन्माला येतो. त्यांचे चरित्र भावी पिढ्यांना मार्गदर्शक आणि देशभक्ती निर्माण करणारे आहे.' अशा शब्दात श्री. वा. ना. उत्पात यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले आहे.

'देशभक्तीची उर्जा निर्माण करणारे पुस्तक' असा उल्लेख स्वा. सावरकर साहित्य मंडळाचे अध्यक्ष श्री. शंकर द. गोखले यांनी केला आहे. 'सावरकांचे राष्ट्रोद्धारक विचार, तत्वज्ञान आणि कार्य विद्यार्थी व युवकांसाठी उपलब्ध माध्यमांतून सर्वांना पोहोचवता आले तर देशात सामाजिक, राजकीय क्रांती व परिवर्तन होऊ शकेल'. असे गौरवोगार श्री. शंकर गोखले यांनी या पुस्तकाविषयी काढले आहेत.

पुस्तकाला पुरस्कार देताना इतिहासाचे अभ्यासक, उत्तम वक्ते, लेखक श्री. वि. ह. भूमकर म्हणतात ''१८५७ चे स्वातंत्र्यसमर ही क्रांतिकारकांची भगवत्‌गीता होती तर 'धगधगते यज्ञकुंड–वि. दा. सावरकर हे पुस्तक क्रांतिवीरांवर प्रेम करणाऱ्या राष्ट्रभक्तांची 'गीताई' आहे. चैतन्य मंत्राच्या सामर्थ्यात राष्ट्र जिवंत राहते. चैतन्याचा हा नवा मंत्र नव्या पिढीला नव्या जोमाने देण्याचे कार्य श्री. नेर्लेकर यांनी केले आहे.'' भूमकर यांचे विचार पुस्तकाविषयी, लेखकाविषयी बरंच काही सांगून जातात.

ज्येष्ठ आणि अभ्यासू समीक्षक श्री. श्रीराम बोरकर यांची प्रस्तावना या पुस्तकाला लाभली आहे. 'आम्ही कुणाला आदर्श मानावे? कुणाचा कित्ता गिरवावा?' असा विद्यमान युवा पिढीचा रोखठोक सवाल आहे. या पिढीच्या डोळ्यासमोर जिता–जागता आणि त्यांच्याबरोबर वावरणारा साक्षात आदर्श नसल्याची त्यांची तक्रार, खंत आहे. ती निराधार, निरर्थक म्हणता येणार नाही. सद्यस्थिती तरुणांचा तेजोभंग, भ्रमनिरास करणारी असल्यामुळे युयुत्सु वृत्तीला साजेल अशा आदर्शासाठी भूतकाळात जावे लागते हे खरे. श्री. वा. नेर्लेकर यांनी लिहिलेले हे स्वातंत्र्यवीरांचे छोटे जीवनचरित्र त्या दृष्टीने युवापिढीला मननीय वाटेल यात शंका नाही.'' बोरकरांचे हे विचार पुस्तकाविषयी फार बोलके वाटतात. पुस्तकाविषयी 'थोडेसे मनातले' या दृष्टीने विचार मांडताना लेखक म्हणतो 'सावरकर म्हणजे अस्सल शंभर नंबरी सोने होय. त्यांचे चरित्र म्हणजे स्वातंत्र्य समराची महन्मंगल गाथा. 'स्वतंत्र भारत' हा त्यांचा श्वास होता. ८३ वर्षांचे त्यांचे आयुष्य म्हणजे या श्वासाचाच एक धगधगता इतिहास आहे. स्वातंत्र्य लढा अनेक जण लढले आणि त्यामुळेच देश स्वतंत्र झाला. परंतु सावरकर अक्षरश: स्वातंत्र्यसमर जगले. इतक्या निष्ठेने आणि उत्कटतेने देशासाठी स्वातंत्र्यसमर जगणारा दुसरा महापुरुष चुकूनसुद्धा इतिहासात आढळत नाही. त्यामुळेच विनायक दामोदर सावरकर हे नुसते नाव नाही; तर मंत्र आहे. सावरकर अनेक जणांना परिचित असतील, परंतु खऱ्या अर्थाने किती जणांना ते कळले, उमगले या बद्दल शंका आहे. प्रस्तुत पुस्तक म्हणजे आजच्या विद्यार्थ्यांना म्हणजेच भारताची तारणहार असलेल्या उमलत्या पिढीला त्यांच्या उत्कट जीवनाचे दर्शन घडवण्याचा केलेला प्रयत्न आहे. मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर तर स्वातंत्र्यवीरांचे जीवन आणि कार्य म्हणजे बालतरुणांसाठी प्रेरणा स्रोत आहे. या पुस्तकामध्ये सावरकरांच्या आयुष्यातील ठळक घटना घेऊन त्या फुलवत त्यांतून त्यांचे चरित्र सांगण्याचा वेगळा प्रयत्न केला असल्याचे लेखक म्हणतो.

'व्यास क्रिएशन' या प्रकाशन संस्थेने हे पुस्तक प्रकाशित केले असून केवळ 'प्रकाशक' म्हणून याकडे न पाहता ते एक 'राष्ट्रकार्य' असल्याची भावना प्रकाशकाची आहे. इतिहास ज्यांनी घडविला त्यांचे आयुष्य आपण आज प्रेरणा मानून मार्गक्रमण केल पाहिजे. या पुस्तकाच्या माध्यमातून 'प्रखर राष्ट्रवाद' जोपासला जावा अशी अंतरिक इच्छा प्रकाशकाने व्यक्त केली आहे. सावरकर हा विषय आणि आशय सुद्धढ मनात घट्ट रुजावा, यासाठी ही लोक चळवळ आहे. या पुस्तकाच्या एक लाख प्रती महाराष्ट्रातील गावा–गावातून, शाळा–शाळातून, वाचनालयातून पोहोचाव्यात असा प्रकाशकाचा संकल्प आणि ध्यास आहे.

साठ पृष्ठे, आकर्षक, चित्तवेधक रंगीत लॅमिनेट केलेलं सावरकरांच छायाचित्र असलेल्या मुखपृष्ठासहित पुस्तकाची

किंमत केवळ रु. चाळीस एवढीच आहे. मुखपृष्ठाच्या आतील पानावर सावरकरांचे ओजस्वी आणि तेजस्वी विचार, त्यांचा आवेशपूर्ण फोटो, अखंड हिन्दुस्थानाचा नकाशा, भगवा झेंडा हे सर्व पुस्तकाचं विशेष आकर्षण आहे मलपृष्ठावर स्वातंत्र्यवीरांचा फोटो आणि पुस्तकांविषयीचा अभिप्राय, संदेश उद्धृत केला आहे.

पृष्ठ क्रमांक ५६ ते ५८ स्वातंत्र्यवीरांचा जीवनपट तारीखवार वाचकांसाठी उपलब्ध करून दिला आहे. ५९ व्या पानावर 'ने मजसी ने मातृभूमीला! सागरा प्राण तळमळला!' ही सावरकरांची उत्कट आणि हृदयस्पर्शी कविता उध्दृत केली आहे.

'धगधगते यज्ञकुंड' हे पुस्तकाचं शिर्षक जरी असल तरी श्री. नेर्लेकर यांनी सोप्या, सरळ आणि सुलभ भाषेचा वापर केला असून ओघवती भाषा असल्यामुळे पुस्तकाची रंगत वाढली आहे. वाचताना कुठेही थांबावेसे वाटत नाही. एका बैठकीत वाचावं असा हे पुस्तक आहे. मला ते विलक्षण भावलं आवडलं. श्री. नेर्लेकर यांची सावरकर भक्ती उत्कट, अकृत्रिम आणि अथांग आहे. त्यात अंधश्रद्धेचा भाग नाही. त्यांच्या सावरकर प्रेमाला समतोल अभ्यासाचं आणि भक्तिभावाचे सुंदर अधिष्ठान प्राप्त झाले आहे. याच दृष्टीने केवळ विद्यार्थ्यांनीच नव्हे तर सर्व मराठी वाचकांनी विकत घेऊन संग्रही ठेवावे, अशा योग्यतेचे हे पुस्तक आहे असे आवर्जून सांगावेसे वाटते. या पुस्तकाच्या एक लाख प्रती सर्वत्र पोहोचविण्याच्या संकल्पास हार्दिक शुभेच्छा!

स्वातंत्र्य समरासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या ज्ञात – अज्ञात स्वातंत्र्ययोध्यांना ही पुस्तिका अर्पण केली आहे. अच्युत पालवांसारख्या मान्यवरांचे मुखपृष्ठ, सुधीर मुणगेकरांची सजावट, मांडणी पुस्तिकेचा विशेष आहेत. सावरकरांची सुवचने, कविता, विविध प्रसंगातील छायाचित्रे पुस्तकाची सघनता वाढविण्यास भर घालतात. स्वातंत्र्यवीरांविषयी केवळ एकाच वाक्यात सांगावयाचे झाल्यास ''झाले बहु, होतीलही बहु परंतु या सम हाच!'' या समर्थ शब्दांतच त्यांचे वर्णन करावे लागेल.

**श्री. सुरेंद्र लागू**
२ / पहिला मजला, यमुना सोसायटी,
गोविंद बच्चाजी रोड, चरई, ठाणे (प.)
दूरध्वनी – २५३४९३४१

●●●

## *'तिरंग्या' च्या प्रणेत्या*

मादाम कामा यांच्या संकल्पनेच्या विकासातूनच पुढे आजच्या तिरंग्याचा जन्म झाला, ही बाब विशेषत्वाने नमूद करायला हवी.

मुंबईतील धनाढ्य पारशी कुटुंबात जन्मलेल्या मादाम कामा या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरांच्या 'अभिनव भारत' या क्रांतिकारी संघटनेच्या सदस्या होता. १९०७ साली जर्मतीनील स्टुटगार्ड शहरात 'जागतिक समाजवादी परिषद' भरली होती. या परिषदेला 'अभिनव भारत' तर्फे भारताच्या प्रतिनिधी म्हणून मादाम कामा यांना पाठविण्यात आले होते. परिषदेत मादाम कामा यांनी ज्या तडफेने भारतीय स्वातंत्र्याची बाजू मांडली ते पाहून उपस्थित समुदाय स्तिमित झाला. याच परिषदेत मादाम कामा यांनी पहिला तिरंगा ध्वज फडकवला. तो दिवस होता २२ ऑगस्ट १९०७. आश्चर्य म्हणजे मादाम कामा यांनी परिषदेला उपस्थित असलेल्या सदस्यांना तिरंग्याला मानवंदना द्यायला लावली. ब्रिटिशांचा तेव्हाच्या आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रचंड दबदबा होता. या पार्श्वभूमीवर मादाम कामा यांनी पार पाडलेली जबाबदारी नि:संशय थोर होती. अशा या थोर क्रांतिज्योतीचे १३ ऑगस्ट १९३६ रोजी निधन झाले.

साहित्य जगत

# संध्या - समालोचन

श्री. दत्तात्रय मोरेश्वर रबडे (२१ ब, आयडियल पार्क, आयडियल कॉलनी, कोथरूड, पुणे - ४११ ०२९) यांनी मोठे परिश्रम घेऊन 'संध्या समालोचन' हा ग्रंथ (पृ. ४९६ मूल्य रु. २००/-) लिहून त्यांच्याच पुष्पप्रेम प्रकाशनातर्फे प्रकशित केलेला आहे.

**ग्रंथाची आवश्यकता :**

सनातन वैदिक धर्मियांच्या सोळा संस्कारांपैकी बाल्यावस्था संपल्यावर विद्या ग्रहणाच्या शिक्षणाच्या पूर्व तयारीचा, वयाच्या ८ व्या वर्षी करण्याचा प्रमुख असा पहिला संस्कार म्हणजेच व्रतबंध. उपनयन संस्कार व ह्या मौंजीबंधन संस्कारातीलच संध्यावंदन हा अत्यावश्यक नित्यविधी आणि त्यापुढील सर्व आयुष्यभर संध्या ही नित्य कर्म उपासना म्हणून जोपासावयाची असते. ग्रंथाचे लेखक श्री. रबडे म्हणतात, 'नवविज्ञानी भाषेत संध्या संस्कार - विधी सांगण्याचा प्रस्तुत ग्रंथाद्वारे प्रयत्न करीत आहोत. आजच्या तथाकथित पुढारलेल्या आधुनिक काळात देवधर्म, पूजाअर्चा किंवा नुसतेच देवदर्शनही हा एक टिंगलीचा व मागासलेपणाचा विषय झाला आहे. डोक्यावर टोपी असणे हे ही बुरसटलेल्या विचारांचे प्रतीक वाटते. मग नित्य 'संध्यावंदनाची' गोष्ट तर दूरच राहिली. ह्यास्तव ह्या 'संध्या समालोचन' ग्रंथाची आवश्यकता भासली!

**लेखक परिचय :**

श्री. रबडे यांचा जन्म नारायणगाव (ता. जुन्नर, जि. पुणे) प्राथमिक व माध्यमिक शालेय शिक्षण जुन्नर व पुणे येथे झाले. १९४८ मध्ये मुंबई विद्यापीठाची मॅट्रिकची परीक्षा द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. बालवयापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रतिज्ञीत स्वयंसेवक म्हणून हिंदू विचारांचे संस्कार व कार्य जून १९५२ मध्ये पुण्यातील कसबा पेठेतील प्रकाश मित्रमंडळ या सामाजिक संस्थेचे ते कार्यकारी अध्यक्ष असताना त्यांनी स्वातंत्र्य सूर्य वि. दा. तथा तात्याराव सावरकर यांचा, सरसंघचालक पूजनीय मा. स. गोळवलकर गुरुजी यांच्या शुभहस्ते सत्कार केला. त्याचवेळी मराठीचा सार्थ अभिमान धरण्याची आज्ञा व आशीर्वाद स्वातंत्र्यवीरांकडून त्यांच्या दादरच्या (मुंबई) वास्तूत लाभला.

सन १९५२ ते १९८५ पर्यंत त्यांनी पुणे - खडक - वासला येथील केंद्रीय जलविद्युत अन्वेषण केंद्रात ३३ वर्षे इमाने इतबारे नोकरी केली. १९५८ मध्ये त्यांनी पूर्णवादाचार्य विद्वतरत्न प. पू. रामचंद्र महाराज पारनेरकर यांची उपासना घेतली व तेव्हापासून आजतागायत पूर्णवादाच्या विविध कार्यात सक्रिय सहभाग घेतला. १९६४ पर्यंत राज्यस्तरा-वरील क्रिकेट पंच व १९७१ ते १९८५ पर्यंत राष्ट्रीय पंच म्हणून भारतातील अनेक रणजी सामान्यांत यशस्वी पंच म्हणून कामगिरी केली. १९९३ पासून पूर्णवाद वर्धिष्णु प. पू. पारनेरकर महाराज पुरस्कृत शास्त्रशुद्ध पंचांग समितीचे कार्यवाह म्हणून विशेष जबाबदारीचे कार्य केले व त्यांच्या अनेक प्रवचनांचा संकलनाचा ध्यास घेतला. अनेक प्रवचनांची टिपणे 'सत्यशोधक समाज' पाथिक मासिकात प्रसिद्ध केली व याच निष्ठेतून 'अमृतकुंभ' (१९९२) 'रथसप्तमी' (१९९३) व मातृदेवोभव (१९९७) हे ग्रंथही प्रकाशित केले.

**ग्रंथाचे अंतरंग :**

संध्यावंदन मंत्रातील दैवी अतींद्रिय दृष्टीची विचारसरणी आणि अद्यावत भौतिक विज्ञान यांची सांगड घालून सनातन वैदिक हिन्दू संस्कृती किती श्रेष्ठ आणि उत्तुंग आहे, हे थोड्याशा विस्तृत प्रमाणात दाखविण्याचा प्रयत्न

लेखकाने या ग्रंथात केलेला आहे. 'संध्या वंदना म्हणजे काय?', 'संध्योपासनेचे महत्त्व', 'संध्योपासनेतील विधींचा हेतू/उद्देश', 'संध्यावंदनेचे विविध प्रकार', 'संध्यावंदन करण्याची पद्धत', 'संध्या केल्याने काय लाभ होतो?', 'संध्यावंदनेकरीता आवश्यक गोष्टी', 'संध्योपासना विधि', 'आनुषंगिक विधि विवेचन', 'उपसंहार', 'श्रीशुक्लयजुर्वेदीय त्रिकाल संध्या', 'श्रीकृष्ण यजुर्वेदीय त्रिकाल संध्या', 'संदर्भ ग्रंथ' इ. इ. प्रकरणांतून संध्येसंबंधी अत्यंत मौलिक स्वरूपाची माहिति दिलेली आहे.

**संध्याकोश :**

श्री. रबडे हे हाडाचे कार्यकर्ते. अत्यंत मेहनती स्वभावाचे. वचननिष्ठ. पत्नीने तिच्या शेवटच्या आजारपणात विचारले होते, ''काहो! गेली पन्नास वर्षे तुम्ही नित्य संध्योपासना करता पण तुम्हांला तरी संध्येचा अर्थ कळला का? आता इतर सारे लिखाण बंद करा व फक्त संध्येसंबंधीच लिहा! पत्नीची ही शेवटची इच्छा पूर्ण करण्याचा पणच त्यांनी केला. वास्तविक संस्कृत हा त्यांचा प्राधान्याचा विषय नव्हता. धर्मशास्त्रावर व वेदांवरही त्यांचा 'खास असा अभ्यास नव्हता. ते कोणी पट्टीचे वक्ते, प्रवचनकार अगर उच्च विद्या संपन्न पंडितही नव्हेत. पण पत्नीची शेवटची इच्छा पूर्ण करण्याची ध्यासच त्यांनी घेतला आणि चार - पाच वर्षे त्यांनी अविश्रांत श्रम घेऊन हा अपूर्व असा ग्रंथ साकार केला. केवळ संध्येवरीलच जवळजवळ ३०-३२ ग्रंथांचा (त्याची सूची ग्रंथाच्या शेवटी दिलेली आहे.) अभ्यास केला. या कामी डॉ. विष्णु शास्त्री सातापूरकर (मुलुंड - मुं.), वेदमूर्ती स. वा. कोल्हटकर व त्यांचे वडील वामराव कोल्हटकर, अ. म. परांजपे (ठाणे), नारायणराव जोशी (पुणे), डॉ. आशाताई गुर्जर, प्र. श्री. डोरले इत्यादींनी त्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.

संध्येसंबंधी सर्वकाही सांगणारा हा अप्रतिम ग्रंथसंग्रह आहे. बहुतकोश आहे. उपरोक्त नारायणराव जोशी म्हणतात, 'हा तर संध्याकोषच आहे. कारण समालोचन या शब्दाने फार मर्यादित अर्थ निष्पन्न होतो. पण या ग्रंथाचे जरी ते शीर्षक असले तरी प्रत्यक्षात तो संध्या वंदन विषयक कोशच आहे. विद्यार्थी वर्ग, अभ्यास, जिज्ञासू मंडळींनी हा ग्रंथ आपल्या संग्रही जरूर बाळगावा. संध्या शिकविणाऱ्या गुरुजींना ही तो विशेष उपयुक्त आहे. एका अर्पूर्व ग्रंथाची निर्मिती केल्याबद्दल श्री. दत्तात्रय मोरेश्वर रबडे यांचे मन:पूर्वक अभिनंदन!'

## मराठी लाक्षणिक शब्दकोश

हा कोश म्हणजे आनंदाचा ठेवा आहे. साहित्य प्रसार केंद्राचे भा.ल. तथा राजाभाऊ कुलकर्णी (सीताबर्डी, नागपूर - ४४००१२) यांनी 'मराठी लाक्षणिक कोश' प्रसिद्ध करून (पृ. १८४, मूल्य रु. ६०/-) मराठी वाचकांना एक आनंदाचा ठेवाच बहाल केलेला आहे. कारण लेखक उपासनी यांनी या अप्रतिम कोशाच्या रूपाने मराठी भाषेची बहुमोल सेवा केलेली आहे. शब्दामागील अर्थ, मर्म आपण शब्द ऐकतो, वाचतो. त्याच्या बाह्य स्वरूपावरच आपले लक्ष केंद्रित झालेले असते. शब्दाच्या अंतरंगात आपण कधी डोकावून पाहतच नाही! त्याला काही अर्थ आहे याची आपल्याला जाणीवच नसते. त्या शब्दाच्या आतल्या भागात विविध प्रकारच्या संदर्भाचे जे पडदे असतात ते बाजूला केल्याशिवाय त्यातला संपूर्ण आशय नीट लक्षात येत नाही. आपण सहज बोललेले ऐकतो, ''रामभाऊंच्या अंगाचा तिळपापड झाला.'' हा कोणत्या प्रकारचा पापड? प्रस्तुत कोशाचे लेखक उपासनी याचा उलगडा करतात, 'तीळ लावलेला पापड विस्तवावर टाकला असता एकदम फुगून येतो, लाल होतो व तडतड आवाज करतो. अतिशय राग आल्याने मनुष्याचा चेहराही फुगतो व लाल होतो. त्यावेळी त्याच्या अंगाचा तिळपापड झाला असे म्हणतात. यावरून रागाने अंगाची आग होणे. संतापणे, डोके तापणे हा अर्थ सूचित केला जातो. 'अडला नारायण' अडणीवरचा

शंख उपटसुंभ अनुष्टभ् अर्धचंद्र, अस्तिनीतील निखारा इ. शेकडो शब्दांचे संदर्भही पुस्तकात दिलेले आहेत.)

**डॉ. अ. ना. देशपांडे यांचे मौलिक सहकार्य :**

आळंदीचे सद्गुरू श्री नरसिंह सरस्वती स्वामी महाराज यांनी माझ्या हस्ते ह्या ग्रंथाची निर्मिती करून घेतली अशी प्रस्तुत कोशाचे लेखक र. ल. उपासनी यांची विनम्र भावना आहे. तसेच या ग्रंथनिमितीसाठी त्यांना अनेक व्यक्तींचे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष अमोल सहाय्य झाले असे ते नमुद करतात. डॉ. अ. ना. देशपांडे (नागपूर) यांचे बहुमोल मार्गदर्शन झाले. त्यामुळे डॉ. देशपांडे यांनीच प्रस्तावना लिहावी असा त्यांचा आग्रह होता आणि डॉ. देशपांडे यांनी तो आनंदाने मान्य केला. प्रस्तावनेत ते म्हणतात, ''ज्ञानाने आनंद होतो. मग ते ज्ञान कितीही अल्प प्रमाणात असेना का? ज्ञानाने दृष्टी विस्तारते, व्यापक होते. ज्याला ज्ञान प्राप्त होते त्याला आपल्या विकास झाला आहे हे जाणवू लागते. ज्यांना ज्ञान नाही त्यांच्यापेक्षा आपण मोठे झालो हे त्यांच्या लक्षात येते. आपल्याला जे दिसते ते दुसऱ्याला दिसत नाही. हे पाहून अहंभाव दुखावला जातो. आपल्या नेहमीच्याच वाचनातले बोलण्यातले ऐकण्यातल्या शब्दांची नुसती तोंडओळख असते. आपला परिचय असतो पण केवळ ओझरता. त्यांचा पूर्ण परिचय करून देण्याचे अत्यंत महत्त्वाचे शैक्षणिक दृष्ट्या अत्यंत उपयुक्त असलेले कार्य उपासनी यांनी हा कोश परिश्रम पूर्वक तयार करून पार पाडलेले आहे. शेकडो शब्दांचे जे सामाजिक ऐतिहासिक, पौराणिक, नैसर्गिक संदर्भ दिलेले आहेत ते सर्व ज्ञानवर्धक आहेत व या संदर्भामुळेच कोश फार रोचक झालेला आहे. उपासनी यांचे मन:पूर्वक अभिनंदन.''

प्रत्येकाने हा कोश वाचावाच / संग्रही ठेवावा. पण वाचकांची मोठी पंचाईत होणार आहे. कारण या बहुमोल कोशाची दुसरी आवृत्ती केव्हाच संपलेली आहे. मोठ्या प्रयासाने मला एक प्रत मिळाली व त्यामुळे या उपयुक्त कोशाचा परिचय आपल्याला देता आला. वाचकांना नम्र विनंती त्यांनी प्रकाशकाला एक पत्र पाठवून नवी आवृत्ती काढण्याचा आग्रह धरावा.

**विशेषांक :**

'वसंत' मासिकाचा बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन फिलाडेल्फिया – अमेरिका विशेषांक – २००९

'वंसत' या दर्जेदार मासिकाचा (संस्थापक कै. दत्त प्रसन्न काटदरे, माजी संपादक कै बालशंकर देशपांडे व विख्यात संपादक दिलीप देशपांडे) जुलै २००९ चा अंक हा अमेरिका विशेषांक आहे. अतिथी संपादक आहेत डॉ. अनंत लाभसेटवार (अमेरिका) या मासिकाने (२/८, गोवर्धन बिल्डिंग, गिरगाव कोर्टाच्या मागे, पारेख स्ट्रीट, मुंबई – ४००००४, वा.व. रु. २००/–) आजवर दर्जेदार साहित्य प्रसिद्ध करून वाचकांच्या हृदयात मानाचे स्थान मिळविलेले आहे. महाराष्ट्र बृहन्महाराष्ट्र व परदेशातही या मासिकास वाचक लाभलेले आहेत. गेली ६७ वर्षे ह्या मासिकाने आपले वाङ्मयीन सत्व टिकवून धरलेले आहे. जुलै ०९ च्या या अंकास महाराष्ट्राचे मुख्यमंत्री अशोक चव्हाण आणि प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी (नांदेड), डॉ. सुभाष भेंडे, प्रा. शंकर वैद्या, के. ज. पुरोहित (शांताराम) व डॉ. उषा देशमुख या नामवंत साहित्यिकांचे शुभसंदेश आलेले आहेत. या साऱ्यांनी वसंतची मुक्तकंठाने स्तुती केलेली आहे.

**अमेरिका विशेषांक २००९ :**

या अंकाचे अतिथी संपादक डॉ. अनंत लाभसेटवार (22, Examoor, Toledo, OH 43615, U.S.A.) आपल्या मनोगतात म्हणतात, वसंतचा अमेरिका विशेषांक प्रथमच उत्तर अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या १३० व्या अधिवेशनाच्या वेळी (२००७) सिअटल येथे प्रसिद्ध झाला होता. त्या अंकास वाचकांकडून विशेषत: भारतातील

वाचकांकडून व परदेशातील इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, मॉरिशस येथील रसिकांकडून खूपच. चांगला प्रतिसाद मिळाला. अंक प्रसिद्ध होऊन दोन वर्षे झाली तरी वाचकांकडून मागणीचा ओघ कमी झाला नाही.

भारतीय लेखक ज्या परंपरा, जीर्ण रुढी, जातियता किंवा धर्मभेद यासारख्या बेड्यात गुरफटलेला असतो तशा बंधनात परदेशीचे लेखक अडकलेले नसतात हे या अंकातील विविध लेखांवरून चटकन लक्षात येईल. (स्टनफोर्ड विद्यापीठ – लेखक घडविणार गुरुकुल (प्रा. वसंत कुंभोजकर) रांगोळी नावाचा एक प्रवास (सौ. माधुरी बापट) अशी पण एक कृष्णाष्टमी (मोहन रानडे), भारत अमेरिकासंबंध (डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे) अमेरिकन समीक्षक लॉयनेल ट्रिलिंग – वाङ्मय आणि ऐतिहासिक दृष्टी (डॉ. यशवंत पत्की) प्रवासी भारतीयांनो देश आपल्याला साद देत आहे. उत्स्फूर्त प्रतिसाद द्याल ना? (जयंत चिने), फिटजेरॉल्ड आणि दि ग्रेट गरस्वी (के. ज. पुरोहित) व एकमेका सहाय्य करू ...! (अशोक दगाडे) हे वैचारिक लेख, डॉ. रवीन्द्र गोडसे (अलास्का) व डॉ. प्रकाश लोथे (आशायमरचं टोनिक) यांचे ललित, लेख आणि स्वत: डॉ. अनंत लाभसेटवार डॉ. रत्नप्रभा शहाणे, सौ. जया हुपरीकर, डॉ. ललिता गडभीर व शशिकांत पानट यांच्या कथा इ. मौलिक साहित्य या अंकात आहे. त्यामुळे अंक संग्राह्य झाला आहे.

**श्री. शरद जोशी (ग्रंथ प्रसारक)**
५, अमर कल्पतरू सोसायटी,
देवी चौक, शास्त्रीनगर,
डोंबिवली – ४२१२०२
दूरध्वनी : ९५२५१२-४८६९६७

●●●

## *बुद्धी*

*मानवाची बुद्धी दोन प्रकारची असते. संशय घेणारी 'संशयात्मिका बुद्धी' आणि निश्चय करणारी 'निश्चयात्मिका बुद्धी'.*

*बुद्धीचे पाच प्रमुख (महाभारतानुसार) गुणप्रकार आहेत. १. निद्रावृत्ती, २. सुनिश्चितता, ३. चित्र निरोध सामर्थ्य, ४. संशय, ५. निश्चित स्वरूपाचे ज्ञान. नितिशास्त्रानुसार बुद्धीचे आठ गुणप्रकार आहेत. १. सुश्रूषा, २. श्रवण, ३. ग्रहण, ४. धारण, ५. चिंतन, ६. ऊहापोह, ७. अर्थविज्ञान, ८. तत्त्वज्ञान.*

*माणूस धारण करतोअसे तीन गुणप्रकार आहेत. १) देहबुद्धी, २) जीवबुद्धी, ३) आत्मबुद्धी. मी देह आहेअसे वाटणे ही देहबुद्धी, देह माझा आहे असे वाटणे ही जीवबुद्धी, तर मी देह नसून आत्मा आहे, असे वाटणे ही आत्मबुद्धी होय.*

●●●

*एक विचार*
*पाणी अमूल्य आहे; जपून वापरा.*

# ऑक्सफर्डच्या विज्ञान-इतिहास संग्रहालयाला भेट

*डॉ. सुधाकर आगरकरांच्या चित्रदर्शी लेखांपैकी हा पुढील लेख. त्यांचा लेख वाचल्यावर जणू आपण ते ठिकाणी प्रत्यक्ष पाहात आहोत असे वाटते. ही एका वाचकाची प्रतिक्रिया महत्त्वाची वाटली. चित्रदर्शी आणि प्रवाहीशैली हे त्यांच्या लेखांचे विशेष होय - संपादक*

आदल्या दिवशी ऑक्सफर्ड विद्यापीठ परिसरातून फेरफटका मारताना आम्ही विज्ञान-इतिहास संग्रहालयाची इमारत पाहिलेली होती. दुसऱ्या दिवशी हे संग्रहालय पाहायचेच असे ठरवून आम्ही पुढे निघून गेलो होतो. ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी सकाळीच आम्ही सगळेजण तिथे पोहोचलो, १५-२० पायऱ्या चढून आत गेलो. प्रवेश विनामूल्य आहे. परंतु आपल्याजवळ एखादी बॅग असेल तर ती दारापाशीच जमा करावी लागते. विज्ञान-इतिहास प्रदर्शन तीन वेगवेगळ्या मजल्यावर भरलेले आहे. आपण जेथे प्रवेश करतो तो तळमजला धरला तर त्याच्या खाली दोन मजले आहेत. आम्ही तळमजल्यापासून सुरुवात केली. मागील दशकामध्ये खगोलशास्त्राची प्रगती कशी होत गेली याबद्दलची माहिती या मजल्यावर आहे.


ग्रह ताऱ्यांचे मानवाला फार कुतूहल वाटत आले आहे. त्यांचे निरीक्षण करता यावे यासाठी लहानमोठ्या अनेक दुर्बिणी तयार करण्यात आल्या. अनेक खगोलशास्त्रज्ञांनी त्यांचा वापर केला. प्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ एडमंड हॅले तर या संग्रहालयाच्या जवळच राहात असत. काही दुर्बिणी लहान तर काही मोठ्या, काही अगदीच साध्या तर काही नक्षीकाम केलेल्या, काही पितळेच्या तर काही ब्राँझच्या. अशा अनेक दुर्बिणींचे प्रदर्शन या मजल्यावर भरविलेले आहे. प्रत्येक दुर्बिणीच्या शेजारी तिच्याबद्दल थोडक्यात माहिती लिहिलेली आढळते. या दुर्बिणींचे आपण निरीक्षण करतो आहोत तेवढ्यात आपले लक्ष जाते एका गोल आकाराच्या पान पेटीवर. हा गोल हत्तीच्या पाठीवर ठेवलेला आहे. गोल आणि हत्ती पाहून आपले कुतूहल जागवले जाते. जरा जवळ जाऊन पाहावे तर त्याच्या शेजारी INDIAN BHOOGOL (भारतीय भूगोल) असे लिहिल्याचे दिसते. ही प्रतिकृती इंग्रजांनी भारतातूनच नेलेली आहे. प्राचीन भारतीय खगोलशास्त्रांना असे वाटायचे की पृथ्वीचा आकार गोल असून ती हत्तीच्या पाठीवर स्थिरावली आहे. त्याचीच प्रतिकृती इथल्या कारागिरांनी तयार केली. जे जे आढळेल त्याचा संग्रह करायचा आणि त्याचे प्रदर्शन करायचे अशी इंग्रजांची प्रवृत्ती असल्याने, त्यांनी ही प्रतिकृती भारतातून नेऊन ऑक्सफर्डच्या विज्ञान-इतिहास संग्रहालयात ठेवलेली आहे.



**हत्तीच्या पाठीवरीची पृथ्वी**


संग्रहालयाची इमारत जुनी असून ती दगडांनी बांधलेली आहे. जुन्या इमारतींना असतात तसे लाकडी जिने या इमारतीला आहेत. लाकडी जिन्यांवरून चालायचे म्हणजे बुटांचा मोठा आवाज होतो. म्हणून सावकाश पावले

टाकत आम्ही एक मजला खाली उतरलो. जिन्याच्या कोपऱ्यात जुन्या काळात दुर्बिणी ठेवण्यासाठी वापरण्यात येणारे लाकडी खांब आणि आधार ठेवलेले आहेत. या मजल्यावर एका बाजूला अनेक प्रकारचे सेक्संट ठेवलेले आहे. खगोलीय वस्तूंचे स्थान निश्चित करण्यासाठी या सेक्संटचा उपयोग केला जाई. अगदी लहानशा आकारापासून ते अतिभव्य आकाराचे सेक्संट या प्रदर्शनात आढळतात. त्या सर्वांचे निरीक्षण करून त्यातील काहींची आम्ही छायाचित्रे काढली. त्यानंतर दुसऱ्या बाजूला असलेल्या प्रदर्शनीय वस्तूंकडे वळलो.



**सेक्संट**

पेनिसिलीन या महत्त्वपूर्ण औषधी द्रव्याचा शोध ऑक्सफर्डमधला. १९२९ मध्ये योगायोगाने बेंजामीन फ्रॅकलीन यांना या रसायनाचा शोध लागला. परंतु त्यांना हे रसायन मोठ्या प्रमाणावर तयार करता आले नाही. हे काम विल्यम हार्वे आणि त्यांचा चमू यांनी केले. १९३७ ला दुसऱ्या महायुद्धाची सुरुवात झाली. या युध्दात जखमी झालेल्या सैनिकांना पेनिसिलीन उपयोगी पडेल, म्हणून त्या रसायनांची मोठ्या प्रमाणावर निर्मिती करण्यात आली. हार्वेच्या चमूने त्याची मानवावर चाचणी घेतली आणि एक अतिशय महत्त्वपूर्ण असे औषधी द्रव्य मानवजातीला उपलब्ध करून दिले. पेनिसिलीनची निर्मिती आणि तिचा औषध म्हणून केलेला उपयोग हा इतिहास मनोरंजकच आहे. हाच इतिहास येथे साकारलेला आहे. हार्वेच्या चमूने पेनिसिलीन निर्मितीसाठी वापरलेले सर्व साहित्य येथे ठेवलेले आहे. त्या प्रत्येक उपकरणांची थोडक्यात माहिती दिलेली आहे. त्या वस्तू बघून आणि सोबतची माहिती वाचून पेनिसिलीनच्या विकासाचा संपूर्ण इतिहास आपल्या नजरेपुढे येतो.




**पेनिसिलीन**

सर्वात खालच्या मजल्यावरचे प्रदर्शन पाहण्यासाठी आम्ही जिना उतरून खाली गेलो. या मजल्यावरची रचना जरा वेगळी आहे. प्रदर्शनाच्या दालनात जाण्यापूर्वी आपण एका बोळातून जातो. या बोळाचा त्यांनी शिताफीने उपयोग करून घेतलेला आहे. येथे देखील विज्ञान इतिहासातील वेगवेगळ्या बाबींवर प्रदर्शन भरविले जाते. आम्ही गेलो तेव्हा आईन्स्टाईन या थोर शास्त्रज्ञाच्या जीवनाची आणि त्याच्या कार्याची माहिती देण्यासाठी प्रदर्शन भरविले होते. आपले संशोधन प्रसिध्द केल्यानंतर आईन्स्टाईन ऑक्सफर्डमध्ये व्याख्यान देण्यासाठी आले होते. त्यावेळेस त्यांनी जो फळा वापरला तो सांभाळून ठेवण्यात आलेला आहे. त्याच्या आधारे (Einstein's Blackboard) आइन्साइंनचा फळा असे समर्पक नाव प्रदर्शनाला दिले. प्रदर्शनाच्या सुरुवातीलाच हा फलक ठेवलेला आहे. त्या

फलकावर आईन्स्टाईनच्या अक्षरात काही समीकरणे लिहिलेली आहेत. आपण जसे पुढे जातो तसे आईन्स्टाईनच्या संपूर्ण संशोधनाची कल्पना येते. त्याच्या जीवनातील महत्त्वाचे टप्पे या प्रदर्शनात दाखविले आहेत. जर्मनीच्या पॅटेंट आफीसमधील एक कारकून ते अमेरिकेच्या प्रिन्स्टन विद्यापीठातील प्राध्यापक असा आईन्स्टाईनचा उद्‌बोधक प्रवास. हा संपूर्ण प्रवास चित्ररूपाने साकारलेला आम्हांला पाहायला मिळाला.

आईन्स्टाईनच्या जीवनावरचे प्रदर्शन पाहून आम्ही मूळ प्रदर्शनाकडे वळलो. या मजल्यावर लहान मोठ्या आकाराची अनेक घड्याळे आहेत. कालमापन हा मानवाच्या प्रगतीचा एक महत्त्वाचा भाग आहे. सूर्योदय ते सूर्यास्त यामधील कालावधीपासून अगदी सेकंदांचे भाग करण्यापर्यंत मानवाची मजल गेली आहे. हा इतिहास अतिशय प्रभावीपणे या मजल्यावर साकारलेला आहे. लंबकाचा उपयोग हा कालमापनाच्या प्रगतीतला एक महत्त्वाचा टप्पा आहे. लंबक असलेली अनेक लहानमोठी घड्याळे येथे ठेवलेली आहेत. विशेष म्हणजे यातील बरीचशी घड्याळे चालू असून अचूक वेळ दाखवीत होती.



**लंबकाचे घड्याळ**

खालच्या मजल्यावरचे प्रदर्शन पाहून आम्ही लाकडी जिन्याने तळमजल्यावर आलो. बाहेर पडण्यापूर्वी तिथे विक्रीसाठी ठेवलेल्या वस्तूंवरून आम्ही नजर फिरविली. वाळूचे घड्याळ, सेक्स्टंट, लहान आकाराच्या दुर्बिणी येथे विक्रीसाठी ठेवलेल्या होत्या. त्याचबरोबर विज्ञानाचा इतिहास वर्णन करणारी अनेक पुस्तके तेथे विक्रीसाठी ठेवलेली होती. आमच्यापैकी बऱ्याच जणांनी आपल्या आवडीनुसार खरेदी केली. खरेदीचे हे काम चालू होते तेव्हा आमचे लक्ष तेथे लावलेल्या एका सूचनेकडे गेले. त्या दिवशी संध्याकाळी एक व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्याची ती सूचना होती. व्याख्यानाचा विषय होता ''ऑक्सफर्डचे विज्ञान प्रगतीला योगदान.'' ऑक्सफर्डचे नाव साहित्य, संगीत या क्षेत्रात जास्त आहे. वक्ते ऑक्सफर्ड विद्यापीठातील प्राध्यापक होते. हे व्याख्यान ऐकायला यायचे असे ठरवूनच आम्ही संग्रहालयातून बाहेर पडलो.

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा वैभव नगरी,
कल्याण शीळ रोड, काटई,
ता. कल्याण, जि. ठाणे - ४२१२०४

●●●

**दिशा संपर्क दूरध्वनी**
**२५४२६२७०**

# परिसरवार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा. वि.)

➢ जून २००९ मध्ये झालेल्या IPM या गणित परीक्षेत प्रणिता काळभोर (७ अ) ८४ गुण मिळवून उत्तीर्ण झाली असून पुढील अंतिम परीक्षेसाठी तिची निवड झाली आहे.

➢ निवृत्तीनंतरही प्रथम घटक चाचणी परीक्षेचा अभ्यासक्रम पूर्ण करून श्रीम. आशा जोशी यांनी शाळेला मोलाची मदत केली. तसेच श्री. भोईर सरांच्या रिक्त जागी पालक प्रतिनिधी सौ. मंगला म्हात्रे या ६ वी ७ गणित, विज्ञान विषयांचे अध्यापन करीत आहेत.

➢ दि. ४ व ५ जुलै रोजी 'ग्रहण विज्ञान' मराठी विज्ञान परिषदेतर्फे आयोजित व श्री. हेमंत मोने मार्गदर्शित कार्यशाळेस सौ. सुमिता माने व श्री. बागुल हे उपस्थित होते.

➢ खगोलवर्षानिमित्त शनिवार दि. ४ जुलै रोजी इ. ९ वी व ८ वी अ, ब वर्गांसाठी माजी विद्यार्थी अमेय गोखले यांनी खगोल मंडळ, मुंबई यांच्यातर्फे दृक्‌श्राव्य माध्यमांतून समालोचन सादर केले.

➢ ३१ जुलै रोजी इ. ५ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांनी श्रावणी शुक्रवार साजरा केला.

➢ 'जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय ठाणे' २००७ साठी 'सशस्त्र सेवा ध्वजदिन निधी संकलन' चे उत्कृष्ट निधी संकलनाचे स्मृतिचिन्ह शाळेस प्राप्त झाले.

➢ गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित कार्यक्रमास उपस्थित मान्यवर–

इ. ५ वी – श्रीमती आशा जोशी (निवृत्त शिक्षिका)

इ. ६ वी – श्रीमती भारती जोशी (६ वी इति. पाठ्य. लेखिका)

इ. ७ वी – सौ. शुभांगी गोहाड (माजी उपमुख्या.)

इ. ८ वी – श्री. ज. रा. गवई (पर्यवेक्षक)

इ. ९ वी – श्री. वालावलकर (प्राध्या. V.P.M. Polytechnic)

इ. १० वी – सावित्रीबाई कुलकर्णी (माजी शिक्षका M.H. हायस्कूल)

➢ M.T.S. पुणे परीक्षेत (१० अ) अद्वैत इनामदार व प्रफुल्ल खेडेकर (९ अ) अनुक्रमे दुसऱ्या व आठव्या क्रमांकाने उत्तीर्ण होवून शिष्यवृत्तीस पात्र ठरले.

➢ १ ऑगस्ट रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या ७५ व्या वर्धापनदिनानिमित्त NTS प्राप्त प्रफुल्ल खेडेकर, गणित प्रज्ञा शोध परीक्षा यशस्विनी प्रणिता काळभोर, अक्षया पाटील व महाराष्ट्र जिमनॅस्टिक संघात सुवर्ण पदक प्राप्त प्रीती टिपाले यांचा सत्कार करण्यात आला.

➢ टिळक पुण्यतिथीनिमित्त १ ऑगस्ट रोजी ८ वी साठी आयोजित कार्यक्रमास इतिहास मंडळ सदस्या व ६ वी च्या इतिहास पाठ्यपुस्तक लेखिका श्री. भारती जोशी यांनी प्रमुख पाहुण्या म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

➢ १ ऑगस्ट २००९ शनिवार ठाणे वैभवच्या 'बालवैभव' या विभागात ८ वी ते १० वीच्या ९ विद्यार्थ्यांचे स्वरचित साहित्य छापून आले.

➢ 'हिंदू जागृती मंडळ' या संस्थेमार्फत ३ ऑगस्ट रोजी इ. ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांनी सामुदायिक अथर्वशीर्ष पठणाच्या कार्यक्रमात भाग घेतला. एकूण १९,६३४ आवर्तने करण्यात आली.

➢ ४ ऑगस्ट रोजी 'संस्कृत दिनाचा' सोहळा ९ वी व १० वी च्या विद्यार्थ्यांनी संपन्न केला. यावेळी संस्कृत

विशारद कु. स्मृती काळे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. या शुभदिनी ९ ब व क ने भगवद्गीतेचा अनुक्रमे ५ वा अध्याय व ८ वा अध्याय पठण केला.

या प्रसंगी नारळी पौर्णिमेचे औचित्य साधून प्रमुख अतिथी व मुख्या. सौ. कळमकर यांनी वृक्षांना 'राखी' बांधून आपले पर्यावरण प्रेम अभिनव पद्धतीने व्यक्त केले.

➢ ठाणे भारत स्काऊट-गाईड जिल्हा संस्थेच्या सहचिटणीस पदावर सहा. शिक्षिका सौ. कल्पना बोरवणकर यांची नेमणूक झाली.

'व्यासपीठ' तर्फे क्रांती दिनानिमित्त आयोजित इतिहास शिबिरात शाळेतील शिक्षक सहभागी झाले. यावेळी मध्यवर्ती कारागृह ठाणे येथील हुतात्मा स्मारकाला भेट देऊन श्रद्धांजली अर्पण करण्यात आली व कारागृह ते सन्मित्र सभागृहापर्यंत प्रभात फेरी काढण्यात आली. तेथे प्रा. दाऊद दळवींचे 'स्वातंत्र्य लढ्यातील ठाण्याचे योगदान' या विषयावर व्याख्यान झाले.

➢ 'संस्कृती कलादर्पण' तर्फे झालेल्या गीतगायन स्पर्धेत मृणाली कराळे १० क हिला द्वितीय क्रमांकाचे बक्षीस प्राप्त झाले.

➢ 'सिंफनी म्युझिकतर्फे' आयोजित नृत्य गायन स्पर्धेत निधी प्रभू १० क हिला द्वितीय क्रमांकाचे बक्षीस प्राप्त झाले.

➢ टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या सिद्धिविनायक Infotech School Level Computer Exam. परीक्षेचा निकाल १००% लागला.

➢ महाराष्ट्र शासनतर्फे 'नागरी संरक्षण' विषयांचे प्रशिक्षण शाळेतील ४४ शिक्षक व शिक्षकेतरांनी १००% निकालासहित यशस्विरीत्या पूर्ण केले. यात १९ जणांना प्रावीण्य, २३ जणांना प्रथम व २ जणांना द्वितीय श्रेणी प्राप्त झाली. सदर परीक्षेत उपमुख्याध्यापिका सौ. सुनिता देशपांडे व सौ. साधना कारंडे-जोशी या अनुक्रमे सर्वप्रथम व द्वितीय आल्या.

➢ जुलै २००९ च्या 'शालेय जिज्ञासा' च्या सहल विशेषांकामध्ये १० वी च्या पाच विद्यार्थ्यांच्या लेखांचा समावेश करण्यात आला.

➢ मराठी काव्याची गोडी विद्यार्थ्यांना लागावी, कविता समजून ती जगता यावी यासाठी मा. श्रीमती लीला जोशी आयोजित 'आनंदाचे डोही' हा शुभारंभाचा आणि विनामूल्य कार्यक्रम दि. १ व २ सप्टेंबर ०९ रोजी इ. ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी सादर करण्यात आला.

➢ दि. १३ ते १७ जून दरम्यान इ. ९ वी साठी ७.३० ते ९.३० या वेळात 'जिज्ञासा' संस्थेमार्फत व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली.

➢ ब्राह्मण सेवा संघातर्फे घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत ९ अ मधील ईशानी भावे, तनिषा देसाई व प्रगती आडकर यांना शिष्यवृत्ती प्राप्त झाली.

➢ १० वी अ, ब च्या विद्यार्थ्यांसमोर 'आनंदवनाचे स्नेही मंडळ, ठाणे ' या डॉ. प्रसाद कर्णिक, डॉ. सुयोग मराठे व मीना पाटणकर यांनी दृक्‌श्राव्य माध्यमातून आनंदबनचा लोकबिरादरी प्रकल्प सादर केला.

➢ माजी विद्यार्थी भूषण तासकर (I.I.T. खरकपूर) याने १० वी क च्या विद्यार्थ्यांशी १० वी चे वर्ष, अपयश, नियोजन व हस्ताक्षर यावर चर्चा केली.

➢ समता विचार प्रसारक मंडळातर्फे दिल्या जाणाऱ्या 'एकलव्य गौरव पुरस्कार' साठी शाळेतील तीन विद्यार्थ्यांची निवड झाली.

➢ 'मुंबई ग्राहक पंचायत' ग्राहक जागृती शिक्षण मंडळातर्फे विद्यार्थ्यांमध्ये 'ग्राहक' म्हणून जागृती निर्माण करण्यासाठी पुढील सहा महिने ग्राहक या विषयावर ८ ब

ची एक तासिका व्याख्यानासाठी आयोजित केली आहे.

➢ Techothlon' 09 या IIT गुवाहाटी यांनी आयोजित National School Compitition साठी आयोजित पूर्वपरीक्षेत ९ अ च्या कोमल निंबाळकर व ऋतुजा चंद्रराव यांनी भाग घेतला.

➢ 'जनरल एज्युकेशन सोसायटी दादर' या संस्थेच्या वतीने आयोजित शिक्षक कार्यशाळेस मो. ह. विद्यालय येथे विषय निहाय मार्गदर्शन शिबिरात सौ. वंदना अडसुळे यांनी विज्ञान - १ या विषयाचे मार्गदर्शन केले.

➢ Home Revise Education Privite Ltd. यांच्यातर्फे इ. १० साठी How to use Home Revise या संदर्भात Computer C.D.'s ची कार्यशाळा घेण्यात आली.

➢ ग्रोथ सेंटर, चेंबूर तर्फे ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी २० जुलै रोजी 'अभ्यास कसा करावा' यात 'Munder Method' पद्धतीने विद्यार्थ्यांना समुपदेशन करण्यात आले.

➢ २१ जुलै रोजी इ. ५ वी साठी सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त ५० घोषवाक्ये, सुविचार, म्हणी, कविता व देशांची नावे यावर आधारित एक अभिनव स्पर्धा घेण्यात आली.

➢ दिशा फाऊंडेशन-नोंदणीकृत, स्वयंसेवी एडस् नियंत्रण संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये एडस् विषयी जागृती व जाणीव निर्माण करण्यासाठी शाळेतील ९ वीच्या विद्यार्थ्यांकरीता H.I.V. / AIDS विषयक माहितीपूर्ण 'स्लाईड शो' दाखविण्यात आला.

➢ पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत ऋजुता काबाडी (५ अ), रोशन दिघे (५ इ), करण निपुर्ते (५ अ) हे अनुक्रमे जिल्ह्यात ४, १३ व १५ व्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले.

➢ २६ जुलै रोजी ७ अ व क ला National Award विजेता 'टिंग्या' चित्रपट मल्हार सिनेमागृहात दाखविण्यात आला.

➢ Maths Talent Search (M.T.S.) परीक्षेत प्रणिता काळभोर (७ अ) व अंकुर पांचाळ (७ क) अनुक्रमे राज्यातून ६६ व १६८ व्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले.

➢ २ ऑगस्ट रोजी गणित अध्यापक मंडळातर्फे इ. ५ वी व ८ वीची गणित संबोध परीक्षा घेण्यात आली.

## वि.प्र.मं. चे ठाणे महानगरपालिका विधी महाविद्यालय, ठाणे

➢ विद्या प्रसारक मंडळाच्या ठाणे विधी महाविद्यालयात प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी वादविवाद स्पर्धा दिनांक ११ ऑगस्ट २००९ रोजी घेण्यात आली. स्पर्धेसाठी 'गांधींच्या भूमीत कोणीही गांधींचे अनुकरण करत नाही' हा विषय ठेवण्यात आला होता. स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना उत्तम प्रतिसाद लाभला. परीक्षक म्हणून श्री. एम्. डी. जोशी, श्री. एस्. एम्. पायक व सौ. रश्मी आचार्य यांनी काम पाहिले.

स्पर्धेत श्री. सी. के. कुलकर्णी यांनी प्रथम, श्री. गिरिश अष्टेकर यांनी द्वितीय, श्रीमती वीणा मते यांनी तृतीय तर श्रीमती राशी गुप्ता यांनी उत्तेजनार्थ पारितोषिक पटकाविले.

स्पर्धेचे सूत्रसंचालन तृतीय वर्षाच्या विद्यार्थीनी सौ. सुवर्णा पाटील व द्वितीय वर्षाचे विद्यार्थी श्री. संदीप कांबळे यांनी केले.

➢ दिनांक ११ ऑगस्ट रोजी विधी महाविद्यालयाच्या 'मराठी वाङ्मय मंडळाची' स्थापना करण्यात आली.

➢ एप्रिल २००९ मध्ये झालेल्या विधी महाविद्यालयाच्या परीक्षांच्या निकालाचा तुलनात्मक तक्ता-

| | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | तृतीय वर्ष |
|---|---|---|---|
| महाविद्यालयाचा निकाल | ४५.३३% | ३७% | ६५% |
| विद्यापीठाचा निकाल | २७.२९% | २९.१५% | ४९.७१% |

## वि.प्र.मं. चे तंत्रनिकेतन

**महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (MSBTE) उन्हाळी – २००९ परीक्षेचे निकाल जाहीर :**

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई उन्हाळी – २००९ च्या परीक्षेचे निकाल नुकतेच जाहीर झाले असून विद्या प्रसारक मंडळाच्या, तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. या परीक्षेमध्ये अव्वल क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची अभ्यासक्रमानुसार नावे व त्यांना मिळालेले गुण खालीलप्रमाणे –

**प्रथम वर्ष (सत्र प्रथम + सत्र दोन) :**

| अभ्यासक्रम | विद्यार्थ्यांची नावे | मिळालेले गुण | Out Off | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| CH | जेकॉब, जॉर्ज | ११०० | १५७५ | ६९.८४ |
| CO | पंधारे, दानिश मोहम्मद | १३२० | १५७५ | ८३.८ |
| EPS | टिपनीस, दर्शन सुनिल | १२४९ | १५७५ | ७९.३० |
| IE | खोत, संकल्प जयंत | ११७७ | १४५० | ८१.१७ |
| IF | गंध्रे, प्राची मधुकर | १३४१ | १५७५ | ८५.१२ |
| IS | कोटियन,आदित्य जगजीवनदास | ११८० | १४५० | ८१.३७ |
| MU | मोहिते, रोहिनी रामचंद्र | १०७१ | १४५० | ७३.८६ |

**द्वितीय वर्ष (सत्र तिसरे + सत्र चौथे) :**

| अभ्यासक्रम | विद्यार्थ्यांची नावे | मिळालेले गुण | Out Off | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| CH | साळवी, हर्षदा अविनाश | ११८२ | १५७५ | ७५.०४ |
| CO | वाडेकर, राहूल किरण | १२५८ | १४७५ | ८५.२८ |
| EPS | मदन, गौरी राजेंद्र | १३८५ | १७०० | ८१.४७ |
| IE | प्रभू, अक्षता नरसिंह | १४४७ | १६५० | ८७.६९ |
| IF | अग्रेसर, स्नेहल नितीन | १३०० | १४५० | ८९.६५ |
| IS | नारगोलकर, योगेश राजेंद्र | १३३३ | १६५० | ८०.७८ |
| MU | चव्हाण, निलम दत्ताराम | १३३९ | १६७५ | ७९.९४ |

**तृतीय वर्ष (सत्र पाचवे + सत्र सहावे) :**

| अभ्यासक्रम | विद्यार्थ्यांची नावे | मिळालेले गुण | Out Off | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| CH | वाघमारे, अभिजित अरुण | १४२५ | १६०० | ८९.०६ |
| CO | गुप्ता, आशिष छम्मन | १३२२ | १४५० | ९१.१७ |
| EPS | सिंग, गिरिष भूपेंद्र | १२७८ | १५५० | ८२.४५ |
| IF | मुळे, चिन्मयरी नितिन | १२९६ | १५०० | ८६.४ |
| IE | मोहिते, प्रवीर धनाजी | १४५७ | १६५० | ८८.३० |
| IS | सरपोतदार, कार्तिक अजित | १३३८ | १६०० | ८३.६३ |
| MU | खोत, सुजाता विलास | १४७० | १७०० | ८६.४७ |

वरील यशस्वी विद्यार्थ्याचा प्राचार्य श्री. दि. कृ. नायक यांचे हस्ते दि. १ ऑगस्ट २००९ रोजी पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. शिवाय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडूनही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

वृत्त संकलन
**चंद्रकांत शिंगाडे**
वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे
संकलित

●●●

मुखपृष्ठावरून

संपादकीय

**स्मरण भाभांचे**

१९४५ पासून जगभर अणुशक्ती विज्ञान या विषयाचा अभ्यास व वापर वाढू लागला होता. तेव्हापासून या अणुशक्तीचा शांततापूर्ण कार्यासाठी उपयोग करण्याचे विचार डॉ. भाभा यांच्या मनात चालू झाले होते. त्या दृष्टीने स्वातंत्र्योत्तर भारतात अणु ऊर्जा आयोगाची स्थापना करावी अशी विनंती त्यांनी तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना केली. अशा आयोगाचे महत्त्व त्यांनी नेहरूंना पटवून दिले. अन्न, शिक्षणादी मूलभूत गरजांचा विचार न करता अणुऊर्जेसाठी इतका पैसा खर्च करणे, याला विरोध करणारेही होतेच. पण अणुऊर्जेचा विकास या मूलभूत गरजांसाठीच आवश्यक आहे, हे डॉ. भाभा यांनी जाणले होते.

भाभांच्या संपूर्ण योगदानाचा विचार करता या दृष्टीने ज्या अनेक विज्ञान संस्था त्यांनी निर्माण केल्या त्यांचे आज महत्त्व सिद्ध झालेले दिसते. भारत सरकारचे विज्ञान क्षेत्रातील धोरण डॉ. भाभांच्या या प्रयत्नांतूनच साकारले. अणु ऊर्जा आयोग (DAE), विज्ञान व तंत्रज्ञान संशोधन संस्था (CSIR) यांनी आज भारताला देदीप्यमान यश मिळवण्याचे मार्ग सिद्ध केले आहेत. अणु ऊर्जा आयोगाने संशोधन व विकास कार्याला गती देण्यासाठी भाभा ॲटॉमिक रीसर्च सेंटर, इंदिरा गांधी सेंटर फॉर ॲटॉमिक रीसर्च (IGCAR) या संस्था सुरू केल्या. टाटा ट्रस्ट सरकार मुंबई व केंद्र सरकाराच्या मदतीने सुरू करण्यात आलेली टाटा मूलभूत संशोधन संस्था (TIFR) यांच्या उभारणीतही डॉ. भाभा यांचा सिंहाचा वाटा होता.

अणुऊर्जा संशोधनाबरोबच काळाच्या ओघात जगभर विकसित होत गेलेला दुसरा विषय म्हणजे अंतराळ संशोधन हा होय. या विषयाचे महत्त्व ओळखून डॉ. भाभा यांनी 'भारतीय अंतराळ संशोधन संस्था (ISRO)' या संस्थेची स्थापना करण्यात पुढाकार घेतला.

डॉ. भाभा बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. आपल्या दैनंदिन व कार्यालयीन कामात त्यांच्यातील 'माणूस' अखेरपर्यंत टिकून होता. आपल्या सहकाऱ्यांची योग्य काळजी घेणे याबाबत ते जागरूक होते. 'राऊज बॉल शिष्यवृत्ती' (१९३२), 'आयझॅक न्यूटन शिष्यवृत्ती' (१९३३), या विद्यार्थी दशेतील सन्मानांपासून सुरुवात झालेली सन्मानमालिकाही मोठी होती. १९५४ याली पद्मविभूषण किताब त्यांना मिळाला तर डॉ. मेघनाद सहा पुरस्काराने त्यांना १९६१ साली गौरवण्यात आले.

बालपणापासून चित्रकला व संगीत या विषयांत त्यांना केवळ रुचीच नाही तर चांगली गती होती. मुंबईच्या टाटा मूलभूत संशोधन संस्थेत त्यांनी काढलेली चित्रे आजही आपण पाहू शकतो. अणुऊर्जेच्या विघातक उपयोगास पायबंद घातला पाहिजे असे त्यांचे ठाम मत होते. शांतताप्रिय स्वभावातूनच त्यांचे निसर्गप्रेमही विकसित झाले होते. निसर्ग व पर्यावरणविषयक त्यांच्या दृष्टीची साक्ष त्यांनी पाया रचलेल्या संस्थांभोवती असणाऱ्या उद्यानांतून सहज पटते. २५ जानेवारी १९६६ रोजी अल्पस पर्वतावरून त्यांचे विमान जात असताना त्यांचा अपघाती मृत्यू झाला व भारतातील विज्ञान क्षेत्राचे अपरिमित नुकसान झाले.

भाभा ही व्यक्ती नव्हती तर एक संस्था होती. अनेक उपयुक्त विज्ञान संस्थांच्या त्यांनी निर्माण केलेल्या जाळ्यामुळे जगाला भारताची ओळख झाली. शिक्षणाच्या प्रभावातूनच अशी नररत्ने निर्माण होतात. शांततेसाठी अणुशक्तीचा वापर या त्यांच्या मंत्रानुसारच आज अणुविज्ञानाची प्रगती चालू आहे. या थोर राष्ट्र पुरुषाला जन्मशताब्दीच्या निमित्ताने विनम्र अभिवादन!

**डॉ. विजय बेडेकर**

●●●

# देव्यापराधक्षमापन स्तोत्र



मराठी पद्यानुवाद

*न मंत्र जाणत मी स्तुतिही न जाणतसे*
*आवाहन ध्यान तसे स्तुतिपर कथाही न जाणत मी*
*तुझ्या मुद्रा वा आळवणींचेही ज्ञान न मजला*
*पण आश्रये तुझ्या दुःखे सरतील जाणत मी ।।१ ।।*
*न ठावे रीत पूजेची तसा आळशी निर्धनही मी*
*केले न पूजन म्हणुनि त्वपदाही अंतरलो मी*
*तरी जनद्उद्धारिणी पार्वती उद्धर मज*
*पुत्र निपजे वाईट परि कुमाता न कधी ।।२।।*
*जगी असती सच्छिल तुझी सारीच मुले*
*परि अवखळसा मीच एक विरळ मुलगा*
*त्यागशील जरी मज न ठरे ते उचित परी*
*पुत्र निपजे वाईट परि कुमाता न कधी ।।३ ।।*
*जगन्माते न रचिली कधी पदसेवा*
*दिले नाही कधी द्रव्यही तुजला*
*तरी अतुलनीय प्रेम करिसी मजवरी*
*पुत्र निजे वाईट परि कुमाता न कधी ।।४ ।।*
*पूजाविधीसेवा करूनि बहु भागलो मी*
*त्यजुनि देव पंच्याऐंशी वय गाठले मी*
*हे गणाधीश माते न करिसी कृपा जरी मजवरी*
*अनिकेत अवस्था मग जाऊ कोणा शरण मी ।।५ ।।*
*हे माते खलही गोड वदुनि वक्ता बनति*
*रंकही बाळगे सुवर्ण कोटीचे जवळी*
*प्रभाव मंत्रातील एकाक्षराचा असा*
*मग जपावर्तनांनी फळ किती अगाध मिळते ।।६ ।।*
*जटाधारी चिताभस्म लेपुनि विष पितो*
*कंठी सर्प माळांचे हार धारण करतो*
*तरी विश्वाचा स्वामी म्हणुनि मान्य जगती*
*वरले तुज जन्मांतरी तयाचेच फल प्राप्त त्याने ।।७ ।।*
*मोक्षाची नसे कांक्षा न सुख प्रपंचाचें*
*विशिष्ट ज्ञानही नको न सुख कोणतेही*
*हे मृडानी रुद्राणी शिव शिव भवानी जपता*
*जन्म सरावा मम, हेच इच्छित मी ।।८ ।।*
*शास्त्रानुसार न पूजिले तुला आजवर मी*
*अपशब्द वदुनि चिंतीले कुविचारच मी*
*श्यामले निराधार जो मी त्या मजसी*
*तारशील तर उचितचि होईल ते ।।९ ।।*
*बुडालो संकटी म्हणुनि स्मरतो तुला*
*असे न मानी देवी करुणासागर तू*
*न लबाड हेतू मनी माझिया*
*भुकेले बालक स्मरते मातेला ।।१० ।।*
*हे माते कृपा झालिया तुझी*
*न नवल ठरेल ते जगती*
*अपराध मग्न मुलगा असूनि*
*माता कधी न दुर्लक्षी तयाशी ।।११ ।।*
*जगी न मज सम पापी पापनाशिनीतुजसम*
*हे जाणुनि महादेवी जे योग्य असेल ते करी ।।१२ ।।*
*श्रीशंकराचार्यविरचित देव्यापराधक्षमापन स्तोत्रं*
*संपूर्णम् दुर्गार्पणमस्तु*

**पद्यानुवाद – मोहन पाठक, ठाणे**

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

(स्थापना : १ ऑगस्ट १९३५)

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना नौपाडा, ठाणे १९३५

## *विद्या प्रसारक मंडळाच्या घटक संस्था*

१) डॉ. बेडेकर विद्या मंदिर (प्राथमिक विभाग)
२) डॉ. बेडेकर विद्या मंदिर (माध्यमिक विभाग)
३) सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम विद्यालय (प्राथमिक विभाग)
४) सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम विद्यालय (माध्यमिक विभाग)
५) के. ग. जोशी कला महाविद्यालय व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय
६) बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालय
७) वि. प्र. मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय
८) डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था
९) वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन
१०) वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन माहिती तंत्रज्ञान केंद्र
११) वि. प्र. मंडळाचे प्रगत अभ्यास केंद्र

## उपक्रम

- भावे राष्ट्रीय व्याख्यानमाला
- डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यान
- नारळीपौर्णिमा – संस्कृत दिन
- दिशा व्यासपीठ
- विद्या प्रसारक मंडळ – वर्धापनदिन
- ५ सप्टेंबर – दीक्षान्त समारंभ

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे–४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे–४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे – ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.